ऊ/४८

# मोल-मजूरी आणि

# भांडवल



कार्ल मार्क्स

ऊ/४८

मार्क्सिस्ट वाङ्मय प्रचारक मंडळ पुस्तक १ लें.

# मोल-मजुरी
# व
# भांडवल.

कार्ल मार्क्स.

अनुवादकः-रा. म. जांभेकर.

आवृत्ति १ ली.

ऑक्टोबर १९३२.] [किंमत ०-६-०.

# मार्क्सिस्ट वाङ्मय प्रचारक मंडळ

कार्ल मार्क्स, फ्रेडरिक एंगल्स व लेनीन इत्यादि मार्क्सिस्टांच्या लेखांची व पुस्तकांचीं भाषांतरें प्रसिद्ध करणें व साधारणतः मार्क्सवादी वाङ्मय प्रसिद्ध करणें हा या मंडळाचा मुख्य उद्देश आहे.

एक रुपया प्रवेश फी भरून मंडळाचे कायमचे वर्गणीदार होणारांना मंडळातर्फे प्रसिद्ध होणारें प्रत्येक पुस्तक अर्ध्या किंमतींत मिळेल.

कार्ल मार्क्सचें "मोल-मजूरी व भांडवल" हें मंडळातर्फे पहिलें पुस्तक म्हणून प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

गिरगांव-<br>मुंबई नं. ४

व्यवस्थापक,<br>मार्क्सिस्ट वाङ्मय प्रचारक मंडळ.

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १० | खालून २ री | भांडलदाराच्या | भांडवलदाराच्या |
| १२ | खालून ४ थी | आनवश्यक | अनावश्यक |
| ५६ | वरून ८ पासून पुढें | ज्याला आपण... .........जातें | समग्र उत्पादन-संबंध म्हणजेच ज्याला आपण सामाजिक संबंध अगर समाज. |
| ५६ | खालून ९ वी | विविक्षित | विवक्षित |
| ६० | वरून १२ वी | उत्पादन | उत्पादन |
| ६९ | वरून १ ली | मजूरांचा | मजूरीचा |
| ६९ | खालून १ ली | कामगारांचा | कामगारांची |
| ७९ | वरून ५ वी | तीन | तीस |
| ८२ | वरून ५ वी | भांडवलदाराची | भांडवलदारांची |

# प्रास्ताविक चार शब्द.

अर्थशास्त्रावरील कार्ल मार्क्सचा प्रमाण ग्रंथ **भांडवल** ( Capital ) हा होय. परंतु या ग्रंथाचा विस्तार फार मोठा असून—त्याच्या तीनही विभागांची मिळून पृष्ठसंख्या २५३० वर आहे—त्यांतील विचारसरणीही समजण्यास मधून मधून बरीच कठीण आहे. या दोन कारणांमुळें **भांडवल** या ग्रंथाला हात घालण्यापूर्वीं, त्यांत प्रतिपादन केलेल्या मतांचा व सिद्धांतांचा संक्षेपानें परिचय करून घेण्याची आवश्यकता मार्क्स-वादाच्या बऱ्याच विद्यार्थ्यांस भासते. अर्थात् या मागणीची पूर्ति करणारा असा सोपा आणि प्रास्ताविक निबंध स्वतः मार्क्स-च्याच लेखणींतून उतरला असल्यावर आणखी काय पाहिजे ?

याचा अर्थ कोणी असा केला कीं **भांडवलां**तील सर्व किंवा निदान बहुतेक मुद्द्यांचें आणि सिद्धांतांचें सार **मोल-मजुरी आणि भांडवल** या पुस्तकांत आहे, तर मात्र तो साफ चुकीचा होईल. अत्यंत गहन अशा विचारांनीं ओथंब-लेलीं अडीच हजार छापील पृष्ठें, पंचवीस—तीस पानांच्या एका भाषणांत कोंबणें कोणालाच शक्य नाहीं. **मोल-मजुरी आणि भांडवल** या छोटेखानी पुस्तकाची महती यांत आहे

कीं, भांडवलशाहींत कामगारांची मजुरी कोणत्या नियमानुसार ठरविली जाते, कामगारवर्ग आणि भांडवलदारवर्ग यांचें हितसंबंध नेहमीं परस्परविरोधी कां व कसे असतात, भांडवलशाहींत कामगारवर्गाची पिळणूक कशी होते, भांडवलाची झपाट्यानें वाढ होत असतांही कामगारवर्गाची मजुरी तुलनात्मक दृष्ट्या कमी कशी होत जाते, आणि अखेरीस भांडवलशाही आपल्या अंतर्गत विरोधांमुळें नाश कशी पावते, याचें विवरण या पुस्तकांत मार्क्सनें इतक्या सोप्या आणि थोडक्या शब्दांत केलें आहे कीं **मोल-मजुरी आणि भांडवल** नीट समजल्यास **भांडवल** समजणें विशेष अवघड राहत नाहीं.

वरील गोष्टी शास्त्रशुद्ध आणि पुनः सुलभ रीत्या दर्शविणें ही कांहीं ल्हानसहान कामगिरी नव्हती. एकतर मूल्य ( Value ) आणि किंमत ( Price ) या अर्थशास्त्रांतील दोन मूलभूत कल्पनां ( Concepts ) बद्दल अभिजात अर्थशास्त्राचे मार्तंड ॲडॅम स्मिथ आणि रिकार्डो यांनीं आपल्या ग्रंथांत एवढा गोंधळ माजविला होता कीं त्या गुंतागुंतींतून त्या दोन कल्पनांना सोडविणें हीच एक मोठी बौद्धिक करामत होती. परंतु याहूनही असामान्य असा मार्क्सचा

अर्थशास्त्रांतील शोध म्हणजे **श्रम** ( Labour ) आणि **श्रम-शक्ति** ( Labour-power ) यांमधील भेद हा होय.

हा भेद प्रथम मार्क्सनें जगाच्या निदर्शनास आणला. या भेदामुळें भांडवलदार समाजव्यवस्थेंत **श्रम-शक्ति** ही सुद्धां **क्रयवस्तु** (Commodity) बनते असें ठरून भांडवलशाहीच्या अमदानींत कामगारांचें वेतन कोणत्या नियमानुसार ठरतें, या मोठमोठ्या अर्थशास्त्रज्ञांना न सुटलेल्या गूढ प्रश्नाचा कायमचा निर्णय कसा लागला, हें एंगल्स्नें आपल्या प्रस्तावनेंत खुलासेवार सांगितलेंच आहे. परंतु या भेदामुळें अत्यंत महत्त्वाच्या अशा दुसऱ्या एका आर्थिक प्रश्नावरही शास्त्राचा लक्ख प्रकाश पडला आणि कामगार चळवळीला अतीशय परिणामकारक असें एक बौद्धिक हत्यार प्राप्त झालें. तें असें.

गुलामगिरीच्या पायावर उभारलेल्या समाजरचनेंत प्रत्यक्ष गुलामांचाच क्रयविक्रय होत असल्यामुळें, गुलामांचें दास्यत्व आणि पिळणूक हीं इतकी उघडउघड नजरेंत भरतात कीं, अशा प्रकारचा समाज मानवरक्तशोषणाच्या तत्त्वावर उभारलेला अतएव दोषार्ह व नाशार्ह होय हें कोणीही कबूल करील. इतकेंच काय पण गुलाम हा शरीरतः मालकाची मालमत्ता असल्यामुळें आपली अशीही समजूत होण्याचा संभव

असतो कीं, गुलामाच्या आयुष्यांतील प्रत्येक क्षण मालकासाठीं राबण्यांत जातो व त्याच्या **श्रमा**बद्दल त्याला कांहींच मोबदला मिळत नाहीं. यापुढील म्हणजे सरंजामशाही (Feudal) समाजांतील, जमिनीला बांधलेला शेतकरी (Serf) वर्षांतील कांहीं दिवस स्वतःसाठीं मेहनत करतो व कांहीं दिवस आपल्या सरंजामदारा (Feudal Lord)साठीं करतो. यामुळें ज्या काळांत तो स्वतःसाठीं राबतो व ज्या काळांत दुसऱ्यासाठीं राबतो, ते काळ स्पष्टपणें वेगवेगळे दिसून येतात व अशा रीतीनें पुनः एकदां दलितवर्गाची नागवणूक डोळ्यांत भरल्याशिवाय राहत नाहीं. आधुनिक म्हणजे भांडवलदार समाजाचा उदय झाल्यापासून मात्र प्रथमदर्शनीं तरी असा भास होतो कीं, प्रत्येक कामगार भांडवलदाराला आपले **श्रम** विकून त्याजकडून मोबदल्यांत **मजुरी** घेतो—अर्थात् दोघेही **समानमूल्य** अशा दोन **क्रयवस्तूंची** देवघेव करतात—अर्थात् सत्ताधारी मालकवर्ग आणि पिळला जाणारा दासवर्ग, असा यापुढें प्रश्नच उरत नाहीं !! तर्कशुद्ध अर्थशास्त्राच्या दृष्टीनें हा भास जितका सदोष आहे, तितकाच कामगारवर्गाच्या स्वातंत्र्येच्छेला तो घातुक आहे, ही गोष्ट निःसंशय खरी; परंतु जोंवर **श्रम** आणि **श्रम-शक्ति** यांमधील भेद उघडकीला आला नसता तोंवर या भासालाच सत्य

म्हणून चिकटून राहणें जगाला भाग पडलें असतें ही गोष्टही नाकबूल करणें अशक्य आहे. या भेदामुळेंच मार्क्स असें दाखवूं शकला कीं कामगार मालकास **श्रम** विकत नसून **श्रम-शक्ति** विकत असतो; या भेदामुळेंच, स्वतःस उत्पन्न करण्याकरतां जितक्या **सामाजिक श्रमाची** (socially necessary labour) आवश्यकता असते त्याहून अधिक **मूल्याच्या श्रमाची** पैदास करणें, हा **श्रम-शक्ति** या **क्रयवस्तूचा** एक विशेष गुण आहे, हा उपसिद्धांत निघूं शकतो; अर्थात् या भेदामुळेंच भांडवलदारानें कामगाराला त्याच्या **श्रमाचा** पूर्ण मोबदला देणें कधींच शक्य नाहीं; भांडवलदार आणि कामगार यांचें हित परस्परविरोधी आहे आणि भांडवलशाही नष्ट केल्याशिवाय कामगारवर्गाच्या पिळणुकीचा अंत होणें शक्य नाहीं, या सिद्धांतांसही अभेद्य अशा शास्त्रीय सत्याचें स्वरूप प्राप्त होतें.

कामगार भांडवलदाराला "**श्रम**" विकतो या कल्पनेच्या अनुरोधानें विचार करीत गेलें असतां मार्क्स जो निष्कर्ष काढतो तोच निष्कर्ष काढणें कोणासही तार्किक दृष्ट्या अपरिहार्य आहे, याला दुसराही एक भक्कम पुरावा आहे. तो असा कीं, जोंवर भांडवलशाही क्रांतिकारी अवस्थेंत होती, (म्हणजे १८ व्या शतकाच्या उत्तरार्धांत आणि

१९ व्या शतकाच्या प्रथम चतुर्थांत ) तोंवर तिचे तात्त्विक पुरस्कर्ते **मूल्याच्या** कोणत्या ना कोणत्या तरी **श्रम-मूलक** सिद्धांतांचें ( labour theories of value ) समर्थन करीत असत; परंतु भांडवलशाही समाजरचनेला परिपक्वता आल्यानंतर, म्हणजे तिचा ऱ्हास सुरू झाल्यापासून, त्यांनीं, उदाहरणार्थ जेव्हन्स्, बोहम बावर्क, मार्शल, वगैरेनीं, या सिद्धांतांना अजिबात चाट देऊन **मूल्य हें सीमांत उपयुक्तते** ( Marginal Utility ) मुळें ठरतें, अशा प्रकारचें नवेंच थोतांड अर्थशास्त्रांत सुरू केलें आहे. मार्क्सच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे जीर्णावस्थेंतील भांडवलशाहीच्या प्रोफेसरां-समोरील साध्य, वास्तविक (objective) दृष्ट्या सत्यशोधन हें नसून येनकेन प्रकारेण भांडवलदार समाजपद्धतीचा तात्त्विक (ideological) बचाव करणें हें असतें. असो. हा मुद्दा अधिक विस्तृत करणें येथें अप्रस्तुत होईल. त्याचा सारांश हा कीं, " भांडवलशाहींतील धनोत्पादन हें केवळ **उपयुक्त-वस्तूं** (utilities )चें उत्पादन नसून **विक्रय-मोलाचें** (exchange-value) चें उत्पादन असतें, किंबहुना केवळ **विक्रय-मोलाचें** नसून **वरकड-मोला** ( Surplus-value ) चें उत्पादन असतें, " हा भांडवलदार समाजपद्धतीचा मूलभूत सिद्धांत, **श्रम** आणि **श्रम-शक्ति** यांमधील भेदावर अवलंबून आहे;

आणि हा भेद **मोल–मजुरी आणि भांडवल** या पुस्तकांत कोणाही कामगारास समजेल अशा शब्दांत स्पष्ट करून दाखविला आहे.

**मोल-मजुरी आणि भांडवलां**तील सर्वच मुद्दे असे आहेत कीं, त्यांच्या पार्श्वभूमीविषयीं आणि आजकालच्या आर्थिक प्रश्नांवर ते जो प्रकाश पाडतात त्याविषयीं विवेचन केल्याशिवाय राहवत नाहीं. परंतु विषयमर्यादा ओळखून आम्ही तो मोह आवरून धरतों आणि फक्त एकाच मुद्द्याकडे वाचकांचें लक्ष ओढून हे चार शब्द संपवितों.

मार्क्सच्या लेखनशैलीचा एक विशेष असा आहे कीं,सहज जातां जातां, मोठीं गहन आणि विचारार्ह तत्त्वें तो आपल्या पुस्तकांत पेरीत असतो. **भांडवल** हा प्रचंड ग्रंथ लिहिण्याचा उद्देश, त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंतील एका कंसांतील लहानशा वाक्यांत मार्क्सनें दिला आहे हें ऐकून वाचकांस आश्चर्य वाटेल. तसेंच आपल्या व्यापक सामाजिक तत्त्वज्ञानाचा मूल सिद्धांत, जो **ऐतिहासिक जडवाद** (Historical Materialism) त्यावरही मार्क्सनें स्वतंत्र ग्रंथ कधींच लिहिला नाहीं. ऐतिहासिक जडवादावरील मार्क्सचीं मतें त्याच्या लिखाणांत वेगवेगळ्या ठिकाणीं विखुरलेलीं आपणांस आढळतात. **मोल-मजुरी आणि भांडवल** या लेखांतही या सिद्धांताचा उल्लेख

आहे (पृष्ठ ५६ पहा). जीवशास्त्रा (biology) मध्यें डार्विनच्या शोधांनीं जी क्रांति घडवून आणली, तशाच प्रकारची युग-प्रवर्तक क्रांति समाजशास्त्रांत मार्क्सच्या ऐतिहासिक जडवादानें घडवून आणली याची साक्ष मार्क्सच्या पूर्वींचा व नंतरचा इतिहास तर देत आहेच—आणि प्रत्यक्ष इतिहासापेक्षां अधिक भक्कम असा वास्तविक पुरावा कोणत्याही सिद्धांताला मिळणें शक्य नाहीं—परंतु उशीरानें कां होईना, मॉरिस डॉब, मिस्कीं वगैरे भांडवलादारी विश्वविद्यालयांतील प्रोफेसरही ही गोष्ट आतां मान्य करूं लागले आहेत, हें अर्थपूर्ण सत्य वाचकांनीं लक्षांत घ्यावें.

ऐतिहासिक जडवादाचा तत्त्वज्ञानविषयक (metaphysical) भाग आपण सध्यां बाजूला ठेवूं. त्याचा समाजशास्त्रविषयक (sociological) भाग आपणांस असें सांगतो कीं जीव मात्रांची संवेदना (consciousness) ही विरोधजन्यगति (dialectic motion) मुळें जडा(matter) मध्यें सतत होणाऱ्या स्थित्यंतराचें एक कार्य (function) आहे. अर्थात् मन आणि त्याच्या विकासामुळें अस्तित्वांत येणारीं सामाजिक शास्त्रें, कितीही प्रगल्भ रूपांत का असेनात, परंतु अशाच प्रकारचे व्यापार समजले पाहिजेत. याच पुस्तकाच्या छप्पन्नाव्या पानावर मार्क्स म्हणतो, "......सामाजिक संबंध म्हणजे **समाजां-**

तील उत्पादन संबंध, उत्पादनशक्तीच्या म्हणजे जड उत्पादनसामुग्रीच्या होणाऱ्या विकासाबरोबर बदलत जातात." ही जड उत्पादनसामुग्री ( material forces of production ) ही जडाचेंच एक स्थित्यंतर आहे हें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

या सिद्धांतानुसार मार्क्स आणि एंगल्स यांनीं ही गोष्ट जगाच्या दृष्टोत्पत्तीस आणली कीं,सामाजिक उत्पादनसामर्थ्याचा विकास, समाजांतील प्रत्येक व्यक्तीस जिवंत राहण्यासाठीं आवश्यक असणाऱ्या जिनसा तयार करण्यापलीकडे गेला कीं प्रथम मानवसमाजांत वर्गभेद रूढ होतात. यानंतर जसजशी या उत्पादन सामर्थ्याची वाढ होत जाते,तसतशा, गुलामगिरी, सरंजामशाही, भांडवलशाही इत्यादि वेगवेगळ्या प्रकारच्या वर्गभिन्न सामाजिक रचना अस्तित्वांत येऊं लागतात. यांपैकीं हरएक प्रकारच्या समाजव्यवस्थेला अनुरूप अशीं समाजशास्त्रें व सामाजिक संस्था, ( अर्थशास्त्र, राजनीतिशास्त्र, कुटुंबपद्धति वगैरे ) त्या त्या उत्पादनसाधनांच्या पायावर तयार होत जातात. मानव इतिहासांत प्रथम वर्गभेद रूढ झाले, तेव्हांपासून तो आजतागायतचा मानवी इतिहास कंठरवानें या सिद्धांताची ग्वाही देतो. उत्पादनसामर्थ्याच्या वाढीमुळें जेव्हां गुलामगिरीची समाजव्यवस्था नव्या उत्पादनसाधनांना

श्रृंखला होऊन बसली तेव्हां तिला ताडकन तोडून उत्पादन-साधनांनीं सरंजामशाही ( feudalism ) ची समाजव्यवस्था रचली. एवढी जगज्जेती रोमन संस्कृति, ( येथें संस्कृति हा शब्द कोणत्याही एका विशिष्ट प्रकारची संघटित समाजरचना एवढ्याच अर्थानें आम्ही वापरतों ) पण ख्रिस्तधर्मापुढें एखाद्या मातीच्या बुरुजाप्रमाणें ढांसळली याचें कारण ख्रिस्तधर्म हें उगवत्या सरंजामदारी पद्धतीचें मावळत्या गुलामगिरीविरुद्ध बंड होतें, हें कॉट्स्की यांनीं **ख्रिस्तधर्माचा पाया** ( Foundations of Christianity ) या आपल्या पुस्तकांत फारच सुरेख दाखवून दिलें आहे. परंतु एका काळीं क्रांतिकारी आणि सामाजिक उत्क्रांतीला पोषक असलेली सरंजामदार समाजव्यवस्था उत्पादनसाधनांच्या आणखी झालेल्या प्रगतीमुळें, शेवटीं त्याच साधनांच्या विकासाला अडचण होऊन बसली; आणि म्हणून अठराव्या शतकांतल्या जगप्रसिद्ध फ्रेंच क्रांतीनें तिच्या मृत्युनादाची घंटा वाजविण्यास सुरवात केली. परंतु इतिहास तरी किती निर्घृण ! भांडवलशाही ही १७८९ ची जेती; परंतु बरोबर १२८ वर्षांनंतर म्हणजे १९१७ मध्यें तिलासुद्धां वरील नियमानुसार रशियांत जमीनीवर लोळण घालण्यास त्यानें भाग पाडलेंच ! फक्त फरक इतकाच कीं फ्रेंच क्रांतीचें ऐतिहासिक महत्त्व म्हणजे

भांडवलशाही समाजव्यवस्थेचा सरंजामशाहीवरील विजय होय, हें तर्पेच्या तर्पे कॉलेजांतून आणि युनिव्हर्सिट्यांतून शिकविणाऱ्या, आणि भांडवलशाहीचा सतत उदो उदो करणाऱ्या आमच्या प्रोफेसरांना, रशियन क्रांतीचें मर्म म्हणजे उदयोन्मुख समाजसत्तावादी कामगारवर्गानें आसन्नमरण भांडवलशाहीला दिलेला प्राणांतिक घाव, हें मात्र समजत नाहीं ! समजत नाहीं म्हणण्यापेक्षां रुचत नाहीं आणि म्हणून वाळूंत डोकें खुपसून बसणाऱ्या शहामृगाप्रमाणें ते तिकडे कानाडोळा करतात हेंच खरें. एरव्ही जागतिक भांडवलशाहीचे आजकालचे मृत्युशय्येवरील आर्थिक अरिष्ट ( economic crisis ) रूपी झटके व विशेषतः महायुद्धानंतरची यूरोपांतील आर्थिक आणि राजकीय परिस्थिती पाहून ज्याला मार्क्सवाद पटत नाहीं, त्याला अंधबुद्धि ही एकच संज्ञा देणें शक्य आहे.

**मोल-मजुरी आणि भांडवल** हें कांहीं मुख्यतः राजकीय विषयांचें विवेचन नव्हे. तरी वर एके ठिकाणीं निर्देश केलेल्या मार्क्सच्या संवयीप्रमाणें पुस्तकाच्या प्रारंभीच तत्कालीन यूरोपीयन समाजांतील राजकीय वर्गकलहावर मार्क्सनें आपल्या कुंचल्याचे दोनचार फटकारे मारलेच आहेत. त्यांचा

संदर्भ वाचकांना नीट समजावा म्हणून पुस्तकाच्या शेवटीं एक परिशिष्ट जोडण्यांत आलें आहे.

**मोल–मजुरी आणि भांडवल** देशी भाषांत प्रकाशित करण्याचा मुख्य हेतु इंग्रजी न जाणणाऱ्या कामगारांतही झपाट्यानें वर्गजागृति व्हावी, आणि त्यांनीं आपल्याला जखडणाऱ्या गुलामगिरीच्या बेड्या तोडून टाकाव्या हा आहे हें सांगणें अनावश्यक होईल. तेव्हां तो हेतु शक्य तितक्या कमी अवधींत तडीस जावो, हीच शेवटची इच्छा.

मुंबई,
ता. १७ सप्टेंबर, १९३२. } श्री. ग. सरदेसाई.

# मोल-मजूरी व भांडवल.

कार्ल मार्क्स.

# प्रस्तावना.

"मोल–मजुरी आणि भांडवल" हें पुस्तक १८४९ सालीं "न्यू ऱ्हायनित्शे झायटुंग" नांवाच्या एका वर्तमानपत्रांत अग्रलेखांच्या रूपानें प्रथम जगापुढें आलें. **मार्क्सनें जर्मन वर्किंगमेन्स क्लब** ( जर्मन कामगारांचा क्लब ) या संस्थेच्या सभासदापुढें ब्रुसेल्स गांवीं जीं भाषणें केलीं त्यांवरच या पुस्तकाची उभारणी केली आहे. **मार्क्सची** वरील लेखमाला पुरी होऊं शकली नाहीं. त्या सुमारास रशियाच्या सैन्यानें हंगेरी देशावर स्वारी केली; ड्रेसडेन, आयझरलोन, एल्बर-फ़ील्ड, पॅलेटिनेट, आणि बेडन वगैरे ठिकाणीं बंडाचे उठाव झाले. या सर्व एकामागून एक झालेल्या घडामोडीमुळें अखेर "ऱ्हायनित्शे झाइटुंग" या पत्रावरच जर्मन सरकारची गदा आली. (१९ मे १८४९), व तें बंद करावें लागलें. यामुळें २६९ व्या लेखांकाच्या शेवटी **मार्क्सनें** "अपूर्ण" असें लिहिलें. त्यानंतर ती लेखमाला कायमचीच अपूर्ण राहून गेली. आणि दुःखाची गोष्ट ही कीं **मार्क्सच्या** मरणानंतर त्याच्या कागदपत्रांत त्या पुढील लेखांकांचीं हस्तलिखितेंही मिळाली नाहींत.

## मोल-मजुरी आणि भांडवल.

"**मोल-मजुरी आणि भांडवल**" या पुस्तकाच्या पँफ्लेटच्या रूपानें अनेक वेगवेगळ्या आवृत्त्या निघालेल्या आहेत. पैकीं शेवटची आवृत्ति हॉटिंजेन झूरिच येथील "स्विस कोऑपरेटिव्ह प्रेस," (स्विस सहकारी प्रेस) नें १८८४ सालांत काढली. या आजवर काढण्यांत आलेल्या आवृत्त्या अगदीं शब्दशः **मार्क्सच्या** मूळ लेखाबरहुकूम बनविण्यांत आल्या होत्या. परंतु, कामगारचळवळीच्या फैलावासाठीं म्हणून सध्यांच्या नवीन आवृत्तीच्या दहा हजारावर प्रती काढावयाच्या असें ठरलें; त्यामुळें साहजिकच माझ्यापुढें एक प्रश्न उभा राहिला; तो हा कीं दहा हजारांची आवृत्तीहि अगदीं मूळ लेखाबरहुकूमच असावी असें खुद्द **मार्क्सला** तरी वाटलें असतें का ?

१८४० ते १८५० या कालांत **मार्क्सनें** आपली अर्थशास्त्रावरील टीका पुरी केली नव्हती. १८५५ ते १८६० या कालाच्या अखेर अखेर त्यानें ती पुरी केली. यामुळें १८५९ पूर्वींचे **मार्क्सचे** विचार व १८५९ नंतरचे **मार्क्सचे** विचार यामध्यें कांहीं मुद्यावर फरक पडल्याचें आढळून येतें. इतकेंच नव्हे तर Critique of Political Economy चा पहिला भाग १८५९ मध्यें प्रसिद्ध झाला. नंतर **मार्क्सनें** केलेल्या विवेचनाच्या दृष्टीनें पाहतां त्यापूर्वींची

त्याची अर्थशास्त्रावरील टीका कांहीं ठिकाणीं विसंगत तर कांहीं ठिकाणीं चुकीचीहि भासते. आजपर्यंतच्या आवृत्त्या सर्वसाधारणपणें सार्वजनिक उपयोगाखातर काढण्यांत आल्या होत्या. अर्थातच त्यांत लेखकाच्या आधीच्या दृष्टिकोनाला जागा देणें वावगें होतें असें म्हणतां येणार नाहीं. कारण, लेखकाच्या विचारांत कालौघाबरोबर क्रमाक्रमानें होणाऱ्या विकासाबद्दल अनेकास कुतूहल असतें. आणि या दृष्टीनें पाहतां, वाचक काय अगर लेखक काय या उभयतांनाहि मूळ लेखाबरहुकूमच आवृत्त्या निघाव्या असें वाटणें अगदीं रास्त आहे. अशा परिस्थितींत मी मूळ लिखाणांत थोडादेखील फेरफार करणें योग्य झालें नसतें. परंतु सध्या तयार होणारी आवृत्ति **खास कामगार चळवळीच्या प्रसाराखातर** कांढण्यांत येत असल्यामुळें या फेरफाराच्या प्रश्नाला वेगळेंच स्वरूप आलें आहे. खुद्द **मार्क्स** आज हयात असता तर त्यानें देखील १८९९ पूर्वीच्या व नंतरच्या आपल्या विचारांतील विसंगतपणा खात्रीनें दूर केला असता. आणि कामगारांत चळवळीचा फैलाव करण्याच्या दृष्टीनें सर्व महत्वाच्या मुद्यांत जे कांहीं महत्वाचे फेरफार करणें जरूर आहेत ते फेरफार खुद्द **मार्क्सनें** ज्याप्रमाणें केले असते तसेच मीही करीन असा मला

भरंवसा वाटतो. यासाठीं मी वाचकांना प्रथमच एक सूचना देऊन ठेवतों; ती ही कीं, ही आवृत्ति मार्क्सच्या १८४९ मधील लेखाबरहुकूम नाहीं. **मार्क्स** १८९१ सालीं जिवंत राहता तर त्यानें ही जशी सुधारून लिहिली असती तशीच बनविण्याचा मी प्रयत्न करीत आहे. मूळ लेखमालेचा आजवर बराच प्रसार झाला आहे. शिवाय सवड मिळेल तेव्हां फिरून मी एखाद्या संपूर्ण आवृत्तींत ती जशीच्या तशी छापवून घेईनच. परंतु तूर्त या आवृत्तीचा स्वीकार केला जाईल अशी आशा आहे.

**मार्क्सच्या** मूळ लेखांत मी जे फेरफार केले आहेत ते मुख्यतः एकाच मुद्याबाबत आहेत. **मार्क्सच्या** मूळ लेखमालेनुसार, कामगार मालकाला आपले '**श्रम**' विकतो; व त्याबद्दल मोबदला म्हणून तो मालकाकडून मजूरी घेतो. आणि **मार्क्सच्या** नवीन विचारानुसार जरूर ते फेरफार करून मी काढीत असलेल्या या नवीन आवृत्तीनुसार मजूरी हा मोबदला घेऊन कामगार मालकाला आपली '**श्रम–शक्ति**' ( श्रम करण्याची ताकद ) विकतो. **श्रमा** ऐवजी **श्रम–शक्ति** असा फरक मी कां केला याचें कारण मला दिलें पाहिजे. विशेषतः हा फरक करण्याचें कारण कामगारबंधूना समजावून देणें हें माझें कर्तव्य आहे; कारण **श्रमाबद्दल श्रम–शक्ति**

ही केवळ शब्दांची कसरत नाहीं. तर कामकरी वर्ग व भांडवलदार वर्ग यामधील आर्थिक धाग्यादोऱ्यांची सर्व उभारणी त्यावर अवलंबून आहे. अर्थातच अर्थशास्त्राच्या-दृष्टीनें हा मुद्दा फारच महत्त्वाचा आहे. कामगारबंधूंबरोबरच भांडवलदार वर्गांतील धेंडानाहि मला हें समजावून दिलें पाहिजे. पण अशा तऱ्हेच्या गुंतागुंतीच्या आर्थिक प्रश्नांचा कामगारबंधूना जरी तात्काळ उलगडा पडूं शकला तरी भांडवलदारवर्गांतील " सुशिक्षित " शिष्टांच्या मात्र डोक्यांत कदापि प्रकाश पडणार नाहीं! समजावून देण्याचा हेतू इतकाच कीं स्वतःच्या विद्वत्तेचा (!?) गर्व करणाऱ्या भांडवलदार वर्गांतील संभावितांना " अडाणी " आणि "हलक्या दर्जाच्या" कामगारवर्गाची खरी किंमत कळावी !

कारखानदार व गिरणीमालक यांची साधारणपणें अशी कल्पना असते कीं आपण कामगाराकडून त्याचे 'श्रम' विकत घेतों व त्याची किंमत म्हणून कामगाराला मजूरी देतों. जुन्या अर्थशास्त्रज्ञांची देखील अशीच समजूत होती. रोजच्या व्यवहाराच्या दृष्टीनें, हिशोबाच्या दृष्टीनें किंवा किंमती ठरविण्याच्या दृष्टीनें ही ठोकळ कल्पना अगदीं पुरी पडावयाची. परंतु जुन्या अर्थशास्त्रज्ञानीं भोळसरपणें अर्थशास्त्रांत घुसडलेल्या या कल्पनेमुळें पुढें परस्परविरोधी व चुकीच्या सिद्धातांची एकच गर्दी उसळली.

सर्व क्रयवस्तूंच्या किंमती वरचेवर बदलतात; व विशेषतः ज्याला पुराण अर्थशास्त्रज्ञ ‘ श्रम ’ म्हणत त्या ‘श्रमा’ची किंमत वरचेवर पालटते ही गोष्ट अर्थशास्त्रज्ञांना नाकबूल करतां येईना. शिवाय, क्रयवस्तूंच्या पैदाशीशीं ज्यांचा मुळींच संबंध नाहीं अशा अनेक कारणामुळेंहि क्रयवस्तूंच्या किंमतीत चढउतार होतात हें देखील त्याना स्पष्ट दिसून आलें. यामुळें सर्वांना असें भासूं लागलें कीं क्रयवस्तूंचा बाजार भाव हें एक नियमबाह्य वर्तन करणारें अर्थशास्त्रांतील गूढ आहे. परंतु अर्थशास्त्राला क्रमाक्रमानें खरेखुरे शास्त्रीय स्वरूप येत चाललें; व साहजिकपणेंच वरकरणी नियमबाह्य दिसणाऱ्या या किंमतीच्या चढउताराला वास्तविकपणें कारणीभूत होणारा मूलभूत नियम कोणता हें शोधून काढणें अर्थशास्त्रज्ञांचें काम होऊन बसलें. खरें पाहतां किंमतींचा हा वरपांगी नियमबाह्यपणा अशा एका मूलभूत नियमावरच आधारभूत झालेला आहे. हळूं हळूं अर्थशास्त्रज्ञांना असें वाटूं लागलें कीं, आज वर,तर उद्या खालीं, अशा चढउताराच्या चक्रांत सांपडून एकसारख्या बदलणाऱ्या किंमतींतून असा एखादा मध्यवर्ती बिंदू शोधून काढावा कीं ज्याच्या आसपास किंमत नेहमीं वावरत असल्याचें आढळेल. थोडक्यांत किंमतीच्या आधारें क्रयवस्तूंचा असा वास्तविक मोल

शोधून काढण्यास त्यांनीं सुरवात केली कीं ज्यामुळें क्रयवस्तूच्या किंमतीची किमान आणि कमाल मर्यादा ठरविली जाते.

यानंतर जुन्या काळच्या अर्थशास्त्रज्ञांनीं एक ठोकताळा बांधला; तो असाः—क्रयवस्तूच्या पैदाशीसाठीं जरूर असे जितके श्रम तिच्याठायीं एकवटलेले असतात त्यावरून क्रयवस्तूचा वास्तविक मोल ठरतो. येवढ्यावरच त्यांचे समाधान होऊं शकलें; व आपणही तूर्त येथेंच थांबूं. गैरसमज न व्हावा म्हणून या ठिकाणीं मी वाचकाना असें सांगून ठेवतों कीं, क्रयवस्तूंच्या वास्तविक मोलाबद्दलचा वरील नियम अगदी अपुरा असल्याचे अलीकडे नजरेस आलें आहे.

श्रमाच्या अंगीं मोल पैदा करण्याचा जो गूण आहे त्याची प्रथम **कार्ल मार्क्सनें** कसून छाननी केली; व एक महत्त्वाची बाब जगाच्या निदर्शनास आणली; ती ही कीं, क्रयवस्तूंच्या पैदाशीकरतां वरकरणीं किंवा वस्तुतः जरुर असणाऱ्या सर्वच श्रमाचें मोलाची उत्पत्ति करण्यात नेहमीच अंग असतें असें नाहीं. रिकार्डो वगैरे अर्थशास्त्रज्ञाप्रमाणें "क्रयवस्तूंचा वास्तविक मोल त्यामध्यें एकवटलेल्या श्रमावरून ठरतो" असें आम्ही याठिकाणीं थोडक्यांत म्हटलें तर त्याचा अर्थ कोणी असा करूं नये कीं **मार्क्सनें** याबाबत

केलेल्या फेरफाराचा आम्हाला विसर पडला आहे. असो. या बाबतींत मार्क्सच्या **" क्रिटिक ऑफ पोलिटिकल एकॉनमी "** ( अर्थशास्त्रावर टीका ) या पुस्तकांत, व **" कॅपिटल "** (भांडवल) या ग्रंथाच्या पहिल्या भागांत, विस्तृत खुलासा आढळेल.

क्रयवस्तूच्याठायीं एकवटलेल्या श्रमावरुन तिचा मोल ठरविला जातो हें अनुमान जेव्हां ' श्रम ' या क्रयवस्तूलाच लागू करण्याचा अर्थशास्त्रज्ञ प्रयत्न करूं लागले तेव्हां ते एकाहून एक परस्परविरोधी विधानांच्या जाळ्यांत सापडूं लागले. 'श्रम' या क्रयवस्तूचा मोल कसा ठरविला जातो ? वरील अनुमानाप्रमाणें आपण असें म्हणूं कीं, ' श्रम ' या क्रयवस्तूंत जितके श्रम एकवटलेले असतात त्यावरून ' श्रम ' या या क्रयवस्तूचा मोल निश्चित केला जातो. परंतु, एखाद्या कामगाराच्या एक दिवसाच्या, एक आठवड्याच्या अगर एक महिन्याच्या श्रमांत किती श्रम एकवटलेले असतात ? अर्थातच एक दिवसाचे, एक आठवड्याचे, अगर एक महिन्याचे श्रम एकवटलेले असतात. याप्रमाणें श्रम हेच जर मोल मोजण्याचे परिमाण धरले तर ' श्रम ' या क्रयवस्तूचा मोलदेखील आपण केवळ श्रम या परिमाणांतच सांगू शकूं. परंतु, " एका तासाच्या श्रमाचा मोल एक तासाचा श्रम "

असें म्हटल्यानें आपणाला काडीचाहि अर्थबोध होऊं शकत नाहीं ! याप्रमाणें, क्रयवस्तूचा मोल ठरविणारा मूलभूत नियम शोधून काढण्याच्या दृष्टीनें जुन्या अर्थशास्त्रज्ञांचे वर दिलेलें अनुमान अगदीं कुचकामाचें ठरतें; व तें अनुमान प्रमाण मानल्यास आपण घाण्याच्या बैलाप्रमाणें एकाच घेऱ्यांत फिरत राहतों.

या घेऱ्यांतून सुटका व्हावी म्हणून अर्थशास्त्रज्ञांनीं फिरून एक नवीन वळण घेतलें. क्रयवस्तूचा मोल तिच्या पैदासखर्चाइतका असतो असें तें म्हणू लागले. पण फिरून 'श्रम' या क्रयवस्तूचा पैदासखर्च किती हा प्रश्न आलाच ; या प्रश्नाचें उत्तर देण्याकरतां अर्थशास्त्रज्ञांना युक्तिवादांत थोडीशी खुबी लढवावी लागली. 'श्रम' या क्रयवस्तूचा पैदासखर्च काढण्याचा नाद त्यांनीं सोडून दिला; कारण तो प्रत्यक्षपणें निश्चित करणें अशक्य असल्याचें त्यांना आढळून आलें. त्याऐवजीं त्यांनीं खुद्द कामगार पैदा होण्यास जो खर्च लागतो तो काढावयास सुरवात केली. आणि हें करणें शक्य आहे. अर्थातच, वेगवेगळ्या काळीं आणि वेगवेगळ्या परिस्थितींत खुद्द कामगाराची पैदास होण्यास लागणारा खर्च बदलणारच. परंतु समाजाच्या एका ठराविक परिस्थितींत, ठराविक भौगोलिक टापूंत, आणि ठराविक

धंद्यांत, कामगाराच्या पैदाशीचा खर्च आपणाला जवळ जवळ निश्चितपणें ठरवितां येईल. आपण आज भांडवलशाही उत्पादन-पद्धतीच्या अमलाखालीं रहात आहोंत. या भांडवलशाहीच्या अमदानींत कामगारवर्गाची अशी स्थिति आहे कीं तुटपुंजा मजूरीवर भांडवलदारांची चाकरी केल्याखेरीज त्यांना तरणोपायच नाहीं; कारण अवजारें, यंत्रें, सर्व प्रकारचा कच्चा माल व जगण्यासाठीं लागणारीं इतर साधनें वगैरे सर्व उत्पादन-सामग्रीवर आज भांडवलदार वर्गाची मालकी आहे. अशा या भांडवलशाही उत्पादन-पद्धतीच्या अमदानींत कामगार पैदा होण्यास काय खर्च लागतो ? कामगार जिवंत रहावा व त्याच्या अंगीं साधारणपणें रोज राबण्याची ताकद पैदा व्हावी, आणि म्हातारपण, आजार अगर मरण यामुळें गळणाऱ्या कामगारभाईंची जागा घेण्याकरतां अखंडपणें नवीन कामगारांची निपज व्हावी, येवढ्यासाठीं जी साधनें लागतात, त्या साधनांवरून किंवा त्या साधनांच्या किंमतीवरून कामगाराच्या पैदाशीला लागणारा खर्च ठरविला जातो. किंवा थोडक्यांत, भांडलदाराच्या नफेबाजीसाठीं कामगारांचा अखंड पुरवठा व्हावा एवढ्यासाठीं ज्या साधनांची जरूरी लागते,

त्यावरून कामगाराचा पैदासखर्च निश्चित केला जातो असें म्हणावयास हरकत नाहीं.

आपण असें समजू कीं अशा रीतीनें रोज २ रु. किंमतीचीं साधनें कामगाराला लागतात. अर्थातच आपल्या कामगाराला कामावर ठेवणारा भांडवलदार त्याला २ रु. रोजगार देईल. हा भांडवलदार २ रु. रोजगारावर आपल्या कामगाराला रोज १२ तास राबण्याची मुभा देतो, असें आपण समजूं. अशा स्थितींत तो भांडवलदार ठोकळ-मानानें खालीलप्रमाणें हिशोब करतोः—आपण असें धरून चालूं कीं आपला कामगार एक यांत्रिक आहे; व यंत्राचा एक विशिष्ट भाग बनविण्यास त्याला एक दिवस लागतो. हा भाग बनविण्यासाठीं लागणाऱ्या कच्च्या मालाचा खर्च २० रु. पडतो; व इंजिनचें जळण, इतर यंत्र सामुग्रीची झीज, वगैरे मिळून आणखी एक रुपया लागतो अशी आपण कल्पना करूं. आणि कामगाराचा रोजगार २ रुपये आहे. याप्रमाणें त्या यंत्राच्या भागाचा पैदासखर्च २३ रु. झाला. परंतु तो भाग विकून आपल्याला २५ रुपये मिळतील हें भांडवलदार जाणून असतो. याप्रमाणें पैदासखर्च वजा जाऊन दोन रुपये भांडलदाराच्या खिशांत पडतात.

हे भांडवलदाराच्या खिशांत जाणारे वरकड २ रुपये येतात कोठून ? जुन्या अर्थशास्त्रानुसार कोणत्याहि क्रयवस्तूची विक्री सरासरी त्या क्रयवस्तूच्या मोलाइतक्या किंमतीला, म्हणजेच तिच्याठायीं एकवटलेल्या श्रमाच्या किंमतीला, होते. अर्थातच वरील यंत्राचा भाग ज्याअर्थी २५ रुपयांना विकला जातो, त्याअर्थीं त्याचा मोल देखील २५ रुपयेच असला पाहिजे. परंतु या २५ रुपयांपैकीं २० रुपयांचा कच्चा माल व एक रुपयाची झीज–जळण–वगैरे मिळून २१ रुपयांचा मोल आपला कामगार राबूं लागण्यापूर्वींच तयार होता. राहतां राहिले ४ रुपये. आणि आधींच्या २१ रुपये मोलांत या ४ रुपयाच्या मोलाची भर पडली. परंतु आपल्या अर्थशास्त्रज्ञांच्याच म्हणण्याप्रमाणें हा ४ रुपयांचा मोल आपल्या कामगारानें कच्च्या मालावर खर्च केलेल्या श्रमामुळेंच निष्पन्न झाला. याप्रमाणें कामगाराच्या १२ तासाच्या श्रमामुळें ४ रुपयांचा अधिक मोल पैदा झाला. यावरून असें अनुमान निघतें कीं आपल्या यांत्रिकाच्या १२ तास श्रमाचा मोल ४ रुपये असावयास पाहिजे. याप्रमाणें अखेर आपणाला " श्रमाचा मोल " सांपडला !

पण यावर आपला यांत्रिक एकदम खेकसून ओरडतो, " खबरदार ! माझ्या श्रमाचा मोल ४ रुपये होतो म्हणतां ?

पण मालक तर माझ्या तोंडावर फक्त २ च रु. टाकतो ! मालक मला तेहतीसकोटी देवांची शपथ घेऊन सांगतो कीं माझ्या १२ तासाच्या मेहनतीची किंमत फक्त २ च रुपये होते म्हणून; आणि मी ४ मागू लागलों कीं तो मला सरळ वेड्यांत काढतो ! हें काय गौडबंगाल आहे ? ”

कांहीं वेळापूर्वीं आपली घाण्याच्या बैलाप्रमाणें अवस्था झाली. आंता फिरून आपण परस्परविरोधी आणि विसंगत विधानांच्या जाळ्यांत सांपडलों ! आपण ‘ श्रम ’ या क्रय-वस्तूचा मोल शोधावयाचा प्रयत्न केला; आणि मालक देतो त्याहून २ रुपये जास्त म्हणजे ४ रुपये मोल ठरविला. आपल्या यांत्रिकाला १२ तासाच्या श्रमाचा मोल म्हणून केवळ २ च रुपये देण्यांत येतात. आणि यांत्रिकाला १२ तास राबवून भांडवलदार ४ रुपये मोलाचा माल बळकावतो. यातून मजूरी म्हणून यांत्रिकाला तो २ रुपये देतो; आणि वरकड राहिलेले २ रुपये स्वतः गट्ट करतो ! याप्रमाणें ‘ श्रम ’ या क्रयवस्तूचे २ रुपये व ४ रु. असे दोन अगदीं भिन्न मोल निघाले !

‘ श्रम ’ या क्रयवस्तूच्या मोलाची मोजणी पैशांत न करतां आपण ‘ श्रम–काला ’ चे ( Labour-time ) परि-माणांत केली, म्हणजे तर याहूनहि हास्यास्पद असा घोटाळा

माजतो. १२ तासाच्या श्रमामुळें ४ रुपये मोल निष्पन्न होतो. अर्थातच ६ तासांत २ रुपये मोल पैदा केला जाईल. आणि आपल्या यांत्रिकाला १२ तासाच्या श्रमाबद्दल २ च रुपये देण्यांत येतात. यावरून असें दिसतें कीं १२ तासाच्या श्रमाबद्दल यांत्रिकाला ६ च तासाच्या श्रमाचा मोबदला देण्यांत येतो ! याचा अर्थ असा कीं एकतर 'श्रम' या क्रयवस्तूला दोन मोल असून एक दुसऱ्याच्या दुप्पट असतो. किंवा असें नसेल तर १२ म्हणजेच ६ असें म्हणणें भाग पडतें. आणि या दोन्ही प्रकारांत मुळींच तथ्य नाहीं.

याप्रमाणें, जोपर्यंत आपण 'श्रम' हीच क्रयवस्तू मानूं किंवा जोंपर्यंत आपण 'श्रमा'ची खरेदी-विक्री अगर 'श्रमा'चा मोल ही भाषा वापरीत राहूं तोंवर, वाटेल तसा उलट सुलट युक्तिवाद लढवून देखील आपली या विरोधोक्तीच्या कैचींतून सुटका होणार नाहीं. आणि जुन्या अर्थशास्त्रज्ञांची अशीच स्थिति झाली. रिकार्डो आदिकरून अर्थशास्त्रज्ञांची याच विरोधोक्तीच्या कोड्यांतून बाहेर निघतां निघतां तारांबळ उडाली ! याप्रमाणें अर्थशास्त्रज्ञ हतबुद्ध झाले. या कैचींतून बाहेर पडण्याचा मार्ग कोणी दाखवून दिला असेल तर तो **कार्ल मार्क्सनेंच.**

ज्याला अर्थशास्त्रज्ञ ‘श्रमा’ चा पैदासखर्च म्हणत तो ‘श्रमा’ चा पैदासखर्च नसून कामगारच्याच पैदाशीचा खर्च ठरला. आणि कामगार मालकाला श्रम विकत नाहीं. हेंहि आपण पाहिलें. या बाबतींत मार्क्स म्हणतोः——“ज्या क्षणाला कामगार श्रम कराचयास सुरवात करतो त्या क्षणापासून त्याची श्रमावरील मालकी नाहींशी होते आणि स्वतःच्या श्रमावरील मालकी गेल्यानंतर **कामगारानें** मालकाला ‘श्रम’ **विकण्याचा** प्रश्नच उरत नाहीं.” फार तर कांहीं ठराविक काम ठराविक वेळांत पुरें करण्याचे अंगावर घेऊन कामगार, भविष्यकाळांत करावे लागणारें श्रम विकूं शकेल. पण याचा अर्थ असा नव्हे कीं कामगार मालकाला **श्रम** विकतो—कारण श्रमाची विक्री होऊं शकेल ती श्रम पुरे होऊन त्यांना कांहीं मूर्त स्वरूप येईल त्याच वेळीं होऊं शकेल—कामगार मालकाशीं जर कोणता सौदा करीत असेल तर तो हा कीं तो कांहीं ठराविक मुदतीपर्यंत आपली **श्रम करण्याची शक्ती** मालकाच्या हवालीं करतो—मग मजुरी दिवसावर आकारली जावो किंवा पतकरलेल्या कामावर आकारली जावो. आणि याप्रमाणें मालकाच्या हवालीं केलेल्या **श्रम–शक्तीचा** मोबदला म्हणून तो मालकाकडून मजूरी घेतो. याप्रमाणें कामगार मालकाला **श्रम** विकत

नसून आपली श्रम **करण्याची ताकद** म्हणजेच **श्रम-शक्ति** विकतो अगर भाड्यानें देतो.

परंतु ही **श्रमशक्ति** कामगाराच्या शरीरापासून उत्पन्न होत असल्यामुळें कामगारापासून तिची ताटातूट होऊं शकत नाहीं आणि म्हणून, या **श्रम-शक्तीचा** पैदासखर्च आणि आपण वर पाहिलेला प्रत्यक्ष कामगाराच्या पैदाशी-करतां लागणाऱ्या साधनांचा खर्च, या दोहोंत मुळींच भेद उरत नाहीं. सारांश ज्याला **मार्क्स** पूर्वींचे अर्थशास्त्रज्ञ **श्रमाचा** पैदासखर्च म्हणत असत तो वास्तविकपणें काम-गाराच्या पैदाशीसाठीं लागणारा खर्च ठरला आणि काम-गाराच्या पैदाशीकरतां लागणारा खर्च म्हणजेच **श्रम-शक्ती**चा पैदासखर्च हें आपण पाहिलेंच. यापुढें आपण **श्रम-शक्तीच्या** पैदासखर्चावरून **श्रम-शक्तीचा** मोल ठरवूं शकूं, आणि त्यावरून ठराविक धर्तीची आणि ठराविक कसाची **श्रम-शक्ती** पैदास करण्याकरतां उत्पादनकलेच्या एका विशिष्ट अवस्थेंत असलेल्या समाजाला आवश्यक असे किती श्रम खर्ची घालावे लागतील हेंहि आपणाला ठरवितां येईल. आपल्या **'कॅपिटल'** (भांडवल) नामक ग्रंथाच्या पहिल्या खंडांतील सहाव्या भागांत मार्क्सनें "श्रम-शक्तीची देवघेव" या मथळ्याखालीं हें सर्व सविस्तरपणें समजाऊन दिलें आहे.

कांहीं ठराविक मजूरीची बोली मान्य करून कामगारानें आपली श्रम-शक्ति मालकाच्या हवाली केल्यानंतर तिचें पुढें काय होतें ? मालक कामगाराला आपल्या कारखान्यांत अगर गिरणींत जाण्याची परवानगी देतो. त्या ठिकाणीं; कोळसा, हत्यारें, यंत्रें, रंग वगैरे क्रयवस्तूंच्या पैदाशीकरतां लागणारीं सर्व साधनें असतात. येथें कामगार राबावयास सुरवात करतो. आपण वरील उदाहरणांत घेतल्याप्रमाणें त्याचा रोजगार २ रुपये आहे असें आपण समजूं; मग हा रोजगार वेळेवर आकारला जावो कीं अंगावर घेतलेल्या कामावर आकारला जावो. या ठिकाणीं आपण पुनः असें समजूं कीं आपला कामगार बारा तास राबून कच्च्या मालाच्या मोलांत आणखी ४ रुपयांच्या मोलाची भर घालतो. अर्थातच आपल्या कामगारानें बनविलेली क्रयवस्तू विकून मालकाला हे ४ रुपये मिळतात. यापैकीं २ रु. मालक मजूरी म्हणून कामगाराच्या तोंडावर फेकतो व उरलेले २ रु. आपल्या खिशांत टाकतो. आतां जर कामगार १२ तासांत ४ रु. मोल पैदा करतो तर ६ तासांत साहजिकपणेंच तो २ रु. मोल पैदा करील. अर्थातच पहिल्या सहा तासाच्या श्रमानेंच आपला कामगार मालकाकडून मिळणाऱ्या २ रु. मजूरीची फेड करून टाकतो.

६ तास काम झाल्यानंतर कामगार आणि मालक यामध्यें एक पैचेहि देणें घेणें शिल्लक रहात नाहीं.

असें म्हणताच मालक ओरडतो–" खबरदार ! मी कामगाराला १२ तासाच्या बोलीनें भाड्यानें घेतला आहे. सहा तास काम केलें म्हणून कांहीं दिवस पुरा होत नाहीं. कामगारानें उरलेले ६ तास राबलेंच पाहिजे. त्याशिवाय माझा वायदा पुरा होत नाहीं ! " अर्थातच गरीब बिचाऱ्या कामगाराला स्वतःच " आपखुषीनें " केलेल्या सौद्याबरहुकूम २ रु. घेऊन ४ रुपयांचा मोल देणें भागच पडतें.

अंगावर पतकरलेल्या कामाच्या बाबतींतहि तीच तऱ्हा. समजा कीं, आपला कामगार १२ तासांत १२ क्रयवस्तु पैदा करतो. या प्रत्येक क्रयवस्तूसाठीं कच्चा माल व झीज वगैरे मिळून २ रु. खर्च पडतो. आणि दर क्रयवस्तु बाजारांत २ रु. ८ आण्याला विकली जाते. आपल्या पूर्वीच्या प्रमाणानुसार मालक कामगाराला आतां दर क्रयवस्तुमागें ४ आणे देईल–म्हणजेच १२ क्रयवस्तूमागें एकंदर ३ रुपये देइल. ३ रु. मिळविण्याकरतां कामगाराला १२ तास राबावें लागतें. १२ क्रयवस्तू विकून मालकाला एकंदर ३० रुपये मिळतात. १२ क्रयवस्तूंच्या कच्च्या मालासाठीं व इतर झिजेसाठीं खर्च होणारे २४ रु. वजा करतां मालकाजवळ

६ रु. बाकी उरते. यांतून ३ रु. मालक कामगाराच्या हातावर ठेवतो व बाकीचे ३ रु स्वतः गट्ट करतो. फिरून तोच प्रकार ! याहि बाबतींत आपला कामगार स्वतःसाठीं असे फक्त ६ च तास श्रम करतो. आणि उरलेले ६ तास मालक त्याला फुकटांत राबवतो !

कामगार मालकाला **श्रम** विकतो अशी चुकीची समजूत करून घेतल्यामुळें नावाजलेले अर्थशास्त्रज्ञहि ज्या घोटाळ्यांत पडले तो सर्व घोटाळा कामगार **श्रम-शक्ति** विकतो हें ध्यानांत घेतांच पार नाहींसा होतो. सांप्रतच्या भांडवलशाही अमदानींत श्रम-शक्ति ही देखील इतर बाजार-मालाप्रमाणेंच एक क्रयवस्तु बनते. पण या क्रयवस्तूंत एक विशेष आहे. कारण या क्रयवस्तूंत इतर कोणत्याहि क्रयवस्तूंत न आढळणारा असा, **नवीन मोल पैदा करण्याचा** गूण आहे--किंबहुना ही क्रयवस्तु म्हणजेच सर्व मोलाचें मूळ आहे. आणि **एका विशिष्ट धर्तीनें वापरल्यास** हिच्या अंगीं स्वतःच्या मोलाहून अधिक मोल उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आहे. भांडवलशाहीच्या अमदानींत कामगाराची श्रम-शक्ति दररोज स्वतःच्या किंमतीहून ( म्हणजे मजूरीहून ) जास्त मोलाची पैदास करते; इतकेंच नव्हे तर, प्रत्येक शास्त्रीय शोधापासून, आणि यंत्रकलेंतील

हरएक नवीन क्लृप्तीबरोबर, श्रम-शक्तीची किंमत वजा करून मालकाच्या खिशांत पडणारा वरकड मोल अखंडपणें वाढतच जातो म्हणजेच ज्या प्रथमच्या तासांत कामगार स्वतःला मिळणाऱ्या पगाराची फेड करण्यांत गुंतलेला असतो त्या तासांचा आंकडा एकसारखा कमी होत जातो; व ज्या तासांत मालक कामगारांची श्रम-शक्ति फुकटांत लुबाडीत असतो त्या तासांची मर्यादा वाढत जाते.

हीच आपल्या हल्लींच्या समाजाची आर्थिक घटना होय. मोलाची पैदास कोणी करीत असेल तर ती फक्त कामगार वर्गच करतो; कारण मोल हें श्रमाचेंच केवळ एक दुसरें नांव आहे. आणि हल्लींच्या भांडवलशाही समाजरचनेंत, कोणत्याहि क्रयवस्तूंत सामाजिकदृष्ट्या जरूर ( socially necessary ) अशी जितकी श्रम-परिमाणें ( Labour units ) एकवटलेलीं असतात तींच त्या क्रयवस्तूचा मोल ठरवितात. परंतु कामगारांनींच निर्माण केलेल्या मौल्यवान वस्तूंवर कामगारांचा कोठल्याहि प्रकारचा ताबा नसतो ! हत्यारें, यंत्रें, कच्चा माल व इतर भांडवल या **उत्पादन सामुग्रीवरील खाजगी मालकीच्या** जोरावर कामगारवर्गाची श्रम-शक्ति लुबाडणाऱ्या भांडवलदारांचाच सर्व मौल्यवान क्रयवस्तूवर ताबा चालतो. निढळाचा घाम काढून कामगार-

वर्गानेंच असंख्य क्रयवस्तू पैदा करावयाच्या; पण त्यांतून कामगारभाईच्या वाट्याला मात्र अगदींच तुटपुंजा भाग येतो! आणि आपण वर पाहिल्याप्रमाणें भांडवलदारवर्गाकडून गिळंकृत केला जाणारा वरकड मोल मात्र दरएक यांत्रिक सुधारणेबरोबर वाढतच जातो. फार तर भांडवलदारवर्गाला यांतून थोडासा वाटा जमीनदारवर्गाला द्यावा लागत असेल. परंतु कामगारवर्गाला मिळणाऱ्या वाट्यांत वाढ झालीच तर ती गोगलगाईच्या गतीनें व अगदीं क्षुल्लक प्रमाणांत होते. बहुधा या वाट्यांत काट होण्याचाच संभव असतो.

परंतु वाढत्या वेगानें एकामागून एक अस्तित्वांत येणाऱ्या या शोधामुळें, किंवा दिवसानुदिवस कल्पनेपाड झपाट्यानें वाढत जाणाऱ्या या मनुष्याच्या उत्पादन-सामर्थ्यामुळें अखेर समाजांत रणें माजतात. या रणकंदनांत सांप्रतची भांडवलशाही समाजरचना धुळीला मिळाल्यावाचून राहणार नाहीं. एका बाजूला अगणित संपत्ति आणि गिऱ्हाइकांच्या अवाक्याबाहेर गेलेल्या वरकड क्रयवस्तूंचे प्रचंड ढीग, तर दुसऱ्या बाजूला उत्पादन-सामुग्रीला पूर्णपणें पारखा झालेला, पगारी-गुलामगिरीच्या तावडींत सापडलेला, व या गुलामगिरीमुळेंच वरकड क्रयवस्तूंच्या ढिगाऱ्यांना हात लावण्यास असमर्थ बनलेला, कामगारवर्ग अशी परिस्थिति ओढवते.

फाजील श्रीमंतींत लोळणारा मूठभर भांडवलदारांचा एक वर्ग व उपासमारीच्या मगरामिठींत सांपडलेला प्रचंड कामगारवर्ग अशी समाजाची दोन शकलें पडल्यामुळें भांडवलशाही समाज स्वतःच पैदा केलेल्या वरकड क्रयवस्तूंच्या अवाढव्य ढिगाऱ्याखालीं गुदमरूं लागतो; व भयंकर दारिद्र्यांत खितपत पडलेल्या कोट्यावधी लोकांना काडीचाहि आसरा मिळणें दुरापास्त होऊन जातें! आणि दिवसानुदिवस भांडवलशाही समाजाची ही परिस्थिति अधिकाधिक अर्थशून्य व अनवश्यक होत जाते. या परिस्थितीचा नायनाट करणें शक्य आहे इतकेंच नव्हे तर तिचा नायनाट हा केलाच पाहिजे. भांडवल-शाहीहून अगदीं नवीन अशी एक समाजरचना उभारणें शक्य आहे. या समाजरचनेंत सांप्रतचे भिन्न वर्गांमधील तंटे नाहींसे होतील. आर्थिकदृष्ट्या थोड्याफार अडचणीच्या परंतु नैतिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या अशा आरंभीच्या अल्पकालीन संक्रमणावस्थेनंतर, हल्लींच अस्तित्वांत आलेल्या प्रचंड उत्पादन–शक्तींचा पद्धतशीरपणें विकास व उपयोग केल्यानें, आणि प्रत्येकावर श्रम करण्याची सारखी जबाबदारी टाकल्यानें, मानसिक व शारिरिक सामर्थ्याच्या सर्वांगिण विकासासाठीं, व आयुष्याच्या भरपूर उपयोगासाठीं लागणारीं सर्व साधनें सर्वांनाच सारख्या व वाढत्या प्रमाणांत मिळूं

शकतील. आणि अशा तऱ्हेची नवीन समाजरचना उभारण्याचा कामगारवर्गाचा निश्चय दिवसानुदिवस जास्तच बळकट होत चालला आहे हें उद्यां ( मे दिनानिमित्त ) व पुढच्या रविवारी, म्हणजे मेच्या ३ तारखेला, क्रांतिकारक मिरवणुकींच्या व सभांच्या द्वारें कामगारबंधू जगाच्या स्पष्टपणें नजरेस आणतील.

लंडन एप्रिल ३०, १८९१ फ्रेडरिक एंगलस.

# मोल-मजुरी आणि भांडवल

## कार्ल मार्क्स

--:०:--

आमच्यावर चहूंकडून असा एक आक्षेप घेण्यांत येत आहे कीं, हल्लीं चालू असलेलीं वर्ग-युद्धें व राष्ट्रीय युद्धें ज्या वास्तविक आर्थिक परिस्थितीच्या पायावर उभारलीं जात आहेत, त्या आर्थिक परिस्थितीची आम्हीं सविस्तर मांडणी केलेली नाहीं. जेव्हां जेव्हां राजकीय लढायांच्या वेळीं आर्थिक परिस्थितीचा प्रश्न प्रामुख्यानें पुढें आला, त्याच वेळीं फक्त आम्हीं तीबद्दल आपण होऊन चर्चा केली आहे.

असें करण्यांत आमचा हेतू विशेषत: असा होता कीं, प्रचलित इतिहासांतील वर्ग-कलह लोकांच्या नजरेस आणावा; त्याप्रमाणें आज उपलब्ध असलेल्या व रोज वाढत चाललेल्या ऐतिहासिक माहितीच्या प्रत्यक्ष आधारावरून खालील गोष्टी

स्पष्टपणें दाखवून देण्याचा आमचा हेतू होता. फेब्रुवारी व मार्चमधील क्रांतिकारक उठाव घडवून आणणाऱ्या कामगारवर्गाला ज्यावेळीं दडपून टाकण्यांत आलें त्यावेळीं कामगारांचे शत्रू जे फ्रांसमधील भांडवलशाही लोकसत्तेचे पुरस्कर्ते त्यांचाहि पराभव झाला; त्यावेळीं, सरंजामदारी सुलतानशाहीविरुद्ध लढत असलेल्या यूरोपखंडांतील सर्व भांडवलदार व शेतकरीवर्गाचा पराभव झाला. फ्रान्समध्यें ज्यावेळीं 'खऱ्या-खुऱ्या लोकसत्ताक राज्याचा' ('Honest Republic') विजय झाला, त्याचवेळीं क्रांतीला पाठिंबा देण्यासाठीं शौर्यानें स्वातंत्र्य-युद्धं पुकारणाऱ्या राष्ट्रांचा पराभव झाला. आणि अखेर क्रांतिकारक कामगारवर्गाच्या पराजयानंतर यूरोप फिरून आपल्या दुहेरी दास्यत्वांत पडलें--फिरून इंग्लंड व रशियामधील सत्ताधारी वर्गाच्या हातीं पडलें. पॅरीसमधील **जूनचा लढा**, व्हिएन्नाचा पाडाव, बर्लिनमधील १८४८ च्या **नोव्हेंबरची** खेदविनोदजनक घडामोड; पोलंड, इटली, हंगेरी वगैरे देशांचा स्वातंत्र्याखातर बेडर झगडा; आयर्लंडची उपासमार, या सर्व घडामोडी म्हणजे यूरोपमधील भांडवलदार वर्ग व कामगारवर्ग यांमधील वर्गयुद्धाचेच धडधडीत पुरावे होत. या घडामोडीवरून आम्हीं असें सिद्ध करून दाखविलें आहे कीं, क्रांतिकारक कामगारवर्गाच्या हातीं राजकीय सत्ता

येईपर्यंत प्रत्येक क्रांतिकारक उठावाची, मग त्या उठावाचे उद्देश वर्ग कलहापासून वरकरणी कितीहि दूर भासोत, खच्ची झाल्यावांचून राहणार नाहीं. आणि जोंवर कामगार-क्रांतीचे आणि सरंजामशाही प्रतिक्रांतीचे जगाच्या रणमैदानावर दोन हात झालेले नाहींत, तोंवर प्रत्येक सामाजिक सुधारणा म्हणजे एक कविकल्पनाच राहणार. आम्हीं दिल्याप्रमाणें या कालांत यूरोपमध्यें मोठमोठ्या ऐतिहासिक घडामोडी घडून आल्या. बेल्जिअम व स्वित्सरलंड या देशांतील घडामोडी म्हणजे या सार्वत्रिक घडामोडीचाच एक खेदविनोदजनक भाग होय. बेल्जिअमध्यें भांडवलशाही राजेशाहीचा (Bourgeois Monarchy) नमुनेदार मासला उदयास आला; व स्वित्सरलंडमध्यें भांडवलशाही लोकसत्ताक राज्याचा (Bourgeois Republic) आदर्शभूत नमुना उदय पावला. या दोन्ही ठिकाणच्या सत्ताधारी वर्गांचीं अशी भाबडी कल्पना झालेली आहे कीं आपल्या देशांतील राजकीय उलथापालथीचा युरोपमधील सार्वत्रिक क्रांतीशीं अगर तिच्या मुळाशीं असणाऱ्या वर्ग–युद्धाशीं कांहींएक संबंध नाहीं ! ही त्यांची समजूत सपशेल चुकीची आहे हें उघड दिसतें.

१८४८ सालीं वर्ग–युद्धाचें प्रचंड राजकीय घडामोडींत परिवर्तन झालें, तें आमच्या वाचकांना माहीत आहेच.

साहजिकच आतां अधिक खोलवर विचार करण्याची वेळ आलेली आहे. ज्यां आर्थिक परिस्थितीच्या आधारावर भांडवलशाही आणि भांडवलदारवर्गाची हुकमत उभारलेली आहे, त्या आर्थिक परिस्थितीचा, त्या आर्थिक संबंधाचा आतां खोलवर विचार केला पाहिजे. तसेंच कामगारांच्या गुलामगिरीची आतां अधिक बारकाईनें पाहणी करण्याची वेळ आली आहे.

आम्हीं आमच्या लेखाचीं तीन मुख्य विभागांत मांडणी करणार आहोंत. ( १ ) मोल–मजुरी व भांडवल यांचा परस्पर संबंध; कामगाराची गुलामगिरी; भांडवलदारांची हुकमत. ( २ ) सांप्रतच्या समाजपद्धतींत मध्यम–भांडवलदारवर्गाचा व इतर मध्यमवर्गीय नागरिकांचा होणारा अनिवार्य ऱ्हास. ( ३ ) जगाच्या बाजारपेठेंतील सुलतान इंग्लंड देश, त्याकडून भिन्न यूरोपियन राष्ट्रांतील भांडवलदार वर्गावर लादली जाणारी व्यापारी हुकमत व पिळणुक.*

आम्हीं हें पुस्तक अगदीं साध्या, व सर्वांना समजेल अशा भाषेंत लिहिण्याचा प्रयत्न करणार आहोंत. आणि

---

* मी आपल्या प्रस्तावनेंत दिल्याप्रमाणें ही लेखमाला पुरी होऊं शकली नाहीं. हें पुस्तक म्हणजे या तीन भागांतील केवळ पहिल्या म्हणजे " मोल–मजुरी व भांडवल यांमधील संबंध " हा भाग होय—

—फ्रे. एंगल्स

आमच्या वाचकांना अर्थशास्त्राचा ओनामा देखील माहीत नाहीं असें गृहीत धरूनच आम्ही प्रस्तुत विषयाची मांडणी करणार आहोंत आमची इच्छा हीच कीं कामगारभाईनां आमचें म्हणणें नीट समजावें. जर्मनींत तर अगदीं सोप्या अशा आर्थिक गोष्टीबद्दलहि इतकें गाढ अज्ञान पसरलें आहे, व इतका अतोनात गोंधळ माजला आहे, कीं त्याबद्दल आश्चर्य वाटल्यावांचून राहात नाहीं. सध्याच्या राज्यपद्धतीचा उदो उदो करणाऱ्या धंदेवाईक पुरस्कर्त्यांपासून तों थेट शेतांत भटकणाऱ्या सामायिक वृत्तीच्या धनगरापर्यंत, आणि स्वयंमन्य राजकारणपटुपर्यंत सारे एकाच माळेचे मणी ! यादवीनें विभक्त झालेल्या जर्मनी देशांत अशा स्वयंमन्य राजकारणपटूंचें पीक पोप पाद्र्यांहून देखील मुबलक आहे. आतां आपण पहिल्या विभागाकडे वळूं.

## मजूरी म्हणजे काय ? मजूरी कशी ठरविली जाते ?

" तुम्हाला किती मजूरी मिळते ? " असें आपण वेगवेगळ्या कामगारांना विचारलें तर ते काय सांगतील ? कांहींजण म्हणतील—" मला माझ्या मालकाकडून रोजी १ रुपया मिळतो; " दुसरे कांहींजण म्हणतील—" मला रोजी दीड रुपया मिळतो;" वगैरे. याप्रमाणें वेगवेगळ्या धंद्यांतील कामगार कापड काढणें, टाईप जुळविणें, अशा कांहीं ठराविक

कामाचा मोबदला म्हणून आपल्याला मालकाकडून मिळणाऱ्या पैशांचे आंकडे सांगतील. आणि निरनिराळ्या कामगारांनीं निरनिराळे आंकडे सांगितले तरी एका बाबतींत त्या सर्वांचें एकमत होईल. ती बाब ही कीं, कांहीं ठराविक तास काम केल्याबद्दल, अगर कांहीं ठराविक माल काढल्याबद्दल भांडवलदार जे पैसे देतो त्यांचेंच नांव मजूरी.

यावरून असें वाटतें कीं भांडवलदार कामगारांकडून **श्रम** विकत घेतो; आणि कामगार भांडवलदाराला **श्रम** विकतात. परंतु हा केवळ वरपांगी भास आहे. कामगार भांडवलदाराला कांहीं विकत असेल तर ती स्वतःची **श्रम-शक्ति** ( श्रम करण्याची ताकद ) विकतो. भांडवलदार ही श्रम-शक्ति एका दिवसाच्या, आठवड्याच्या अगर महिन्याच्या बोलीनें विकत घेतो. याप्रमाणें श्रम-शक्ति विकत घेतल्यानंतर भांडवलदार कामगाराला कांहीं तास आपल्या कारखान्यांत अगर गिरणींत राबण्याची परवानगी देतो व त्याची श्रम-शक्ति वापरतो. जी रक्कम कामगाराला देऊन भांडवलदार श्रम-शक्ति विकत घेतो त्याच रकमेंत भांडवलदाराला दोन पासरी साखर अगर इतर कांहीं क्रयवस्तू विकत घेतां येईल. आणि ज्याप्रमाणें बाजारांतील साखरेच्या खरेदीसाठीं दुकानदाराला दिलेली रक्कम म्हणजे त्या साखरेची **किंमत** असें

आपण म्हणतों, त्याचप्रमाणें १२ तासांपर्यंत कामगाराची श्रम-शक्ति वापरण्याकरतां म्हणून कामगाराला भांडवलदार जी रक्कम देतो, ती रक्कम म्हणजे १२ तासांच्या श्रम–शक्तीची किंमतच ठरते, हें अगदीं उघड आहे. यावरून हें स्पष्ट होतें कीं कामगाराची श्रम–शक्ति ही देखील साखर, चहा वगैरेप्रमाणेंच एक बाजारवस्तु अगर क्रयवस्तु ( Commodity ) आहे. श्रम–शक्ति मोजतांना ‘ तास ’ हें माप वापरावें लागतें; तर साखर चहा वगैरे क्रयवस्तू मोजतांना वजनें आणि तागडी वापरतात इतकेंच.

भांडवलदाराकडून ‘ पैसे ’ ही क्रयवस्तू घेऊन कामगार त्याला श्रम-शक्ति ही स्वतःजवळील क्रयवस्तू वापरण्यास देतो. आणि या दोन क्रयवस्तूंच्या देवघेवीचें कांहीं ठराविक प्रमाण ठरलेलें असतें; इतकें तास काम केलें तर इतका रोजगार; १२ तास काम केलें तर १ रु. रोजगार; वगैरे. तो एक रुपया खर्चून कामगार १ रु. किंमतीच्या वाटेल त्या निरनिराळ्या क्रयवस्तू खरेदी करूं शकेल; यावरून हें उघड होतें कीं, भांडवलदार कामगाराकडून श्रम-शक्ति वापरावयास घेऊन त्याबद्दल किंमत म्हणून कामगाराला मजूरी देतो असें म्हणणें काय अगर त्या मजूरीच्या रकमेला बाजारांत मिळणाऱ्या क्रयवस्तू कामगाराला देतो असें म्हणणें काय, एकच.

भांडवलदारानें एक दिवस श्रम-शक्ति वापरल्याबद्दल कामगाराला एक रुपया रोजगार दिला असें म्हणणें काय, किंवा एक रुपयाची भांडीं, एक रुपयाचें कापड, किंवा एक रुपयाची डाळ, अशी एक रुपयाची कोणतीहि क्रयवस्तु दिली असें म्हणणें काय, हें एकच. याप्रमाणें श्रम-शक्ति आणि मजूरी यांची देवघेव म्हणजेच श्रम शक्ति आणि क्रयवस्तु यांची देवघेव हें उघड दिसतें. आणि ही देवघेव ज्या कांहीं ठराविक प्रमाणांत केली जाते तें प्रमाण रोजगार अगर मजूरी यावरून कळतें. बारा तासपर्यंत श्रम-शक्ति वापरूं दिली तर एक रुपयाची डाळ मिळते वगैरे. कोणत्याहि दोन क्रयवस्तूंची कांहीं एका ठराविक प्रमाणांत देवघेव होऊं शकते. उदाहरणार्थ, एक शेर साखरेबरोबर तीन शेर कांदे; दोन शेर साखरेबरोबर दीड शेर तुरीची डाळ; किंवा सहा तास श्रम-शक्तीबरोबर एक पायली तांदूळ, वगैरे. याप्रमाणें हरएक क्रयवस्तूचा देवघेवीचा मोल किंवा **विक्रय-मोल** (Exchange Value) ठरलेला असतो. आणि कोणत्याहि क्रयवस्तूचा विक्रय-मोल पैशाच्या रूपांत व्यक्त केला कीं त्याला **किंमत** (Price) म्हणतात. उदाहरणार्थ १ शेर साखर व ६ पैसे यांची देवघेव होऊं शकते; म्हणून ६ पैसे ही

एक शेर साखरेची किंमत झाली. किंवा एक शेर कांद्यांची व दोन पैशांची देवघेव होऊं शकते म्हणून एक शेर कांद्यांची २ पैसे किंमत, असें आपण म्हणतों. त्याचप्रमाणें ६ तासांची श्रम–शक्ति आणि ८ आण्यांची देवघेव होऊं शकते; अर्थातच ८ आणे ही ६ तास श्रमशक्तीची किंमत ठरली. यावरून आपल्या हें ध्यानांत येईल कीं रोजगार अगर मजुरी ही श्रम–शक्तीची किंमत होय. मनुष्यप्राण्याच्या हाडमांसाखेरीज इतरत्र कोठेंहि न आढळणारी अशी क्रयवस्तू जी श्रम–शक्ति तिच्या किंमतीलाच रोजगार अगर मजुरी हें विशेष नांव देण्यांत येतें.

आतां कोणाहि एका कामगाराचें उदाहरण घ्या; तूर्त आपण कापडाच्या गिरणींत सांच्यावर काम करणाराचें उदाहरण घेऊं. भांडवलदार साचेवाल्याला सूत आणि सांचा यांचा पुरवठा करतो. सांचेवाला श्रम–शक्ति खर्च करूं लागतो व त्या सुताचें कापड बनतें. भांडवलदार तें कापड स्वतःच्या ताब्यांत घेतो व तें विकतो. आपण असें समजूं कीं तो तें २० रुपयाला विकतो. आपल्या साचेवाल्याला जी मजुरी देण्यांत येते ती त्यानें काढलेलें कापड विकून आलेल्या २० रुपयांतुन देण्यांत येते काय ? मुळींच नाहीं. त्या कापडाची विक्री होण्यापूर्वीं किंवा तें कापड विणलें जाण्यापूर्वीं कितीतरी

आधीं त्याची मजूरी चुकती झाली असणें शक्य आहे. भांडवलदार साचेवाल्याला मजूरी देतो, ती तयार झालेल्या कापडाची तावडतोब विक्री करून येणाऱ्या रकमेंतून देत नाहीं; तर आधींच हातीं पडलेल्या शिल्लक रकमेंतून देतो. ज्याप्रमाणें भांडवलदारानें साचेवाल्याला पुरविलेला साचा व सूत ही उत्पादनसामुग्री साचेवाल्यानें बनविलेली नसते, त्याचप्रमाणें स्वतःची श्रम-शक्ति वापरण्यास दिल्याबद्दल भांडवलदाराकडून ज्या क्रय-वस्तू साचेवाल्याला मिळतात त्यादेखील त्यानें स्वतः बनविलेल्या नसतात. साचेवाल्यानें काढलेल्या कापडाला भांडवलदाराला कदाचित गिऱ्हाइकच मिळणार नाहीं. कदाचित तें कापड विकून आलेल्या पैशांतून साचेवाल्याच्या मजूरीची भरपाई देखील होणार नाहीं; कदाचित त्या कापडाची विक्री करून साचेवाल्याला मिळणाऱ्या मजूरीच्या रकमेहून खूपच अधिक पैसे भांडवलदाराला मिळूं शकतील. परंतु या बाबींचा व आपल्या साचेवाल्याचा काडीमात्रहि संबंध नसतो. भांडवलदार ज्याप्रमाणें स्वतःजवळील भांडवलांतून कांहीं भाग खर्च करून सूत, साचे, वगैरे उत्पादनाचीं साधनें व कच्चा माल खरेदी करतो, त्याचप्रमाणें तो साचेवाल्याजवळून श्रम-शक्तिही खरेदी करतो. याप्रमाणें, तें कापड काढण्याकरतां लागणारा साचेवाल्याच्या श्रम-शक्तीसकट सर्व माल

खरेदी करून झाल्यानंतर भांडवलदार केवळ स्वःताजवळील कच्च्या मालाचा उपयोग करून क्रयवस्तूची पैदास करतो! आपला मित्र साचेवाला आतां भांडवलदाराचा मिंधा बनतो! आणि ज्याप्रमाणें भांडवलदाराच्या ताब्यांतील निर्जीव साच्याचा तयार कापड विकून आलेल्या २० रुपयांवर कोठल्याहि प्रकारचा हक्क नसतो त्याचप्रमाणें भांडवलदारानें वापरावयास घेतलेल्या कोष्टीरूपी हाडामांसाच्या साच्याचाहि त्यावर काडीमात्र हक्क रहात नाहीं!

याप्रमाणें, कामगार स्वतः जी क्रयवस्तू पैदा करतो त्या क्रयवस्तूवर त्याचा कोठल्याहि प्रकारें हक्क नसतो; कामगाराला जी मजुरी मिळते ती कामगारानें बनविलेल्या क्रयवस्तूच्या विक्रीनें येणाऱ्या रकमेंतून मिळत नाहीं; स्वतःजवळील आधींच तयार असणाऱ्या क्रयवस्तू-मधून कांहीं भाग खर्च करून भांडवलदार कामगाराची श्रम-शक्ति खरेदी करतो.

श्रम-शक्ति ही देखील एक बाजारवस्तु अगर क्रयवस्तु असून कामगार ती भांडवलदाराला विकतो. कामगार आपली श्रम-शक्ति काय म्हणून विकतो? अर्थातच, जगून रहाण्या-साठीं. भांडवलदाराला आपली श्रम-शक्ति वापरावयास देऊन भांडवलदारासाठीं राबणें हेंच कामगारबंधूचें जीवनकार्य होय!

आणि अखंड राबणूक हीच कायती कामगाराच्या जिवंतपणाची प्रचीति होय ! हें जीवित-कार्य भांडवलदाराला विकूनच कामगार पोटापाण्याचीं साधनें मिळवतो. याप्रमाणें कसेंबसें जगूनवाचून राहण्याचा प्रयत्न करणें हेंच कामगारभाईचें जिणें होय ! केवळ जगूनवाचून राहण्यासाठींच कामगाराला जन्मभर राबणें भाग पडतें ! श्रम करणें हा आपल्या जीविताचा एक भाग आहे असें कामगाराला वाटत नाहीं. श्रम म्हणजे आपल्या जीवीतांतून भांडवलदाराकडून तोडून घेतला जाणारा लचका आहे असेंच कामगाराला वाटतें. नफेबाज भांडवलदाराला आपली श्रम-शक्ति ताबडावयास देणें हीच कामगाराच्या जीविताची इतिकर्तव्यता; परंतु ही इतिकर्तव्यता भांडवलदारवर्गानें कामगारावर जबरदस्तीनें लादलेली आहे; कामगार मनापासून श्रम-शक्ति विकत नाहीं; त्याला ती विकणें **भाग पडतें!** आणि म्हणूनच, सर्व क्रयवस्तू जरी कामगारांच्या जीवनकार्यामुळेंच निर्माण होत असल्या तरी क्रयवस्तु पैदा करणें हें **आपलें** ध्येय आहे असें कामगाराला मुळींच वाटत नाहीं. भांडवलदारवर्गाच्या चैनीखातर क्रयवस्तु पैदा करण्यांत कामगाराला अंतःकरणापासून स्फूर्ति किंवा उत्साह असा कांहींच वाटत नाहीं. कामगार जें रेशमी कापड काढतो, कामगार जें सोनें खाणींतून खणून काढतो, किंवा कामगार

जे टोलेजंग राजवाडे बांधतो, त्यापैकीं कामगार स्वतःसाठीं असें कांहींच करीत नाहीं! कामगार स्वतःसाठीं कांहीं निर्माण करीत असेल तर तो केवळ त्याचा रोजगार. कामगार रेशमी कापड काढतो, सोनें खणून काढतो, व राजवाडे उभारतो याचें कारण इतकेंच कीं, ज्यावेळीं भांडवलदारवर्गाला उंची रेशमी कापड काढून द्यावें त्याचवेळीं कामगाराला एखादा फाटकातुटका कुडता मिळतो; जेव्हां भांडवलदारवर्गाला सोनें खणून द्यावें तेव्हांच कामगाराला थोड्याशा तांब्याच्या दिडक्या मिळतात; आणि जर भांडवलदारवर्गाला टोलेजंग हवेल्या बांधून दिल्या तरच कामगाराला रात्र काढण्यापुरतें एखादें खोपट मिळतें! याप्रमाणें, कामागाराला दिवसांतून जें बारा बारा तास विणकाम करण्यांत, सूत काढण्यांत, बांधकाम करण्यांत, खोऱ्या कुदळीनें खड्डे खणण्यांत, किंवा लोहारकाम करण्यांत दवडणें भाग पडतें त्या बारा तासांच्या काबाडकष्टांत कामगारांच्या अंतःकरणाला कोठल्यातरी प्रकारचें समाधान वाटेल काय? आपण आपल्या मनापासून कांहींतरी निर्माण करीत असून, आपले काबाडकष्टाचे बारा तास म्हणजे आपल्या जीविताचें रहस्य आहे, असें कामगाराला कधींतरी वाटणें शक्य आहे काय? मुळींच नाहीं. भांडवलदारवर्गासाठीं निमुटपणें कराव्या लागणाऱ्या काबाडकष्टाची वेळ ज्यावेळीं

संपते, तेव्हांच काय तो कामगाराला स्वतःच्या जीविताबद्दल विचार करण्यास अवसर मिळतो. तेव्हांच त्याचें मानवी जीवन अंशतः तरी सुरू होतें. घरीं भाकर खात असतां अगर पथारीवर पडल्यावेळींच काय ती कामगाराला स्वतःच्या जिवंतपणाची जाणीव होऊं शकते ! बारा तासाच्या हमालींत कामगाराच्या कल्पकपणाला अगर आवडीनावडीला मुळींच वाव मिळत नाहीं. बारा तासांची मेहनत म्हणजे केवळ जगून वाचून राहण्यासाठीं निमुटपणें करावी लागणारी गुलामगिरी; बारा तास काबाडकष्ट म्हणजे महिन्याकाठीं कांहीं रुपड्या मिळविण्याचा मार्ग; बारा तासाची चाकरी म्हणजे पोटाच्या खळगीची कशीबशी भरती करण्याचें निरुपायाचें साधन; अशी कामगाराची अवस्था असते. आळीच्या रूपानें जगून वाचून राहण्यासाठींच जर रेशमाच्या किड्याला रेशीम काढावें लागत असतें, तर रेशमाच्या किड्याचा दाखला भांडवलशाहीच्या हुकमतींतील पगारी-कामगाराला तंतोतंत लागू पडला असता !

श्रम-शक्ति ही कांहीं आरंभापासून 'क्रयवस्तु नव्हती. प्राचीन गुलामगिरीच्या काळांतील गुलाम आपली श्रम-शक्ति धन्याला **विकत** असे असें आपणाला म्हणतां येणार नाहीं. एखादा बैल आपली श्रम-शक्ति शेतकऱ्याला **विकतो** असें

म्हणणें जितकें हास्यास्पद होईल तितकेंच गुलाम आपली श्रम-शक्ति धन्याला **विकत** असे हेंहि विधान हास्यास्पद होईल. गुलाम व त्याची श्रम-शक्ति मिळून सर्वच, धनी एकाच सौद्यांत विकत घेऊन मोकळा होई. गुलाम-पद्धतीच्या काळांत गुलाम हीच क्रयवस्तु असे; व एका मालकाकडून दुसरा मालक त्या क्रयवस्तूची खरेदी करूं शके. सारांश गुलाम स्वतःच क्रयवस्तु असे; पण त्याची श्रम-शक्ति ही मात्र त्याची स्वतःची क्रयवस्तु नसे. शेत-गुलाम ( Serf ) आपल्या श्रम-शक्तीचा कांहीं भाग विकूं शके; त्याला रोजगार मात्र मिळत नसे. सरंजामदाराला शेत-गुलामाकडून फुकटांत श्रम-शक्ति लुबाडावयास मिळे. शेत-गुलाम हा एका ठराविक जमीनीच्या तुकड्याचा मिंधा बनलेला असे, व त्याला ती ठराविक जमीन सोडून जाण्याची मनाई असे;आशातऱ्हेनें जमीनीच्या मालकाला त्याच्या श्रम-शक्तीची फळें लुबाडावयास मिळत. याच्या उलट भांडवलशाहींतील स्वतंत्र कामगार स्वतःलाच क्रमाक्रमानें विकतो; तो दिवसानुदिवस आपल्या जीविताचा ८, १०, १२, अगर १५ तासांचा लिलाव करून, जास्तींत जास्त रोजगार देणाऱ्या मालकाला, म्हणजेच सर्व प्रकारच्या कच्च्या मालावर व उत्पादन सामुग्रीवर सत्ता गाजविणाऱ्या भांडवलदाराला, आपली श्रम-शक्ति विकून टाकतो. भांडवल-

शाहींतील कामगार हा प्राचीन गुलामाप्रमाणें आपल्या भांडवलदार मालकाचा बंदा गुलाम नसतो, किंवा शेतगुलामाप्रमाणें ठराविक जमीनीच्या टापूला जखडलेलाही नसतो. परंतु दररोज त्याच्या जीवितांतील ८, १०, १२ अगर १६ तासांवर त्याला नोकरी देणाऱ्या भांडवलदाराची हुकमत त्याच्यावर चालते. एखाद्या भांडवलदाराला सोडून जाण्याची कामगाराला मुभा असते. त्याचप्रमाणें एखाद्या कामगाराकडून अपेक्षेबरहुकूम फायदा मिळेनासा होतांच भांडवलदारहि वाटेल तेव्हां त्याला रस्त्यावर घालवूं शकतो. परंतु कामगाराचा जीव सर्वस्वी आपल्या श्रम-शक्तीच्या विक्रीवरच अवलंबून असल्यामुळें त्याला सर्वच भांडवलदारांना सोडून जातां येत नाहीं. कोणत्याना कोणत्यातरी भांडवलदाराला स्वतःची श्रम-शक्ति विकणें त्याला **भागच पडतें**; याचाच अर्थ असा कीं एखाद्या वैयक्तिक भांडवलदाराला तो सोडून जाऊं शकला तरी सर्वच भांडवलदारांना सोडून देणें त्याला शक्य होत नाहीं. **त्याची श्रम-शक्ति खरेदी करणाऱ्या लोकांचा वर्ग,** म्हणजेच **भांडवलदारवर्ग** सोडून जाणें त्याला शक्य होत नाहीं. कारण भांडवलदारवर्गाला सोडून दिल्यास त्याला पोटापाण्याचें साधनच उरत नाहीं ! याप्रमाणें कामगारावर कोणत्याहि वैयक्तिक भांडवल-

दाराची सक्तीची मालकी नसली तरी भांडवलदारवर्गाचा तो मिंधाच बनतो ! आणि भांडवलदारवर्गातील कोणत्याना कोणत्या तरी व्यक्तीला आपली श्रम-शक्ति विकणें कामगाराला भाग पडतें !

मजुरी आणि भांडवल या दोहोंमधील धाग्यादोऱ्यांची बारकाईनें छाननी करण्यापूर्वी, ज्या कारणामुळें मजूरीची मर्यादा ठरविली जाते त्या सर्वसाधारण कारणांचा आपण विचार करूं.

आपण वर पाहिल्याप्रमाणें मजूरी ही श्रम-शक्ति या क्रयवस्तूची किंमत होय. अर्थातच, इतर क्रयवस्तूंची किंमत ज्या नियमानुसार ठरते त्याच नियमानुसार श्रम-शक्तीची किंमत, अगर मजूरीची मर्यादा ठरते. साहजिकपणेंच या ठिकाणीं कोणत्याही क्रयवस्तूची किंमत कशी निश्चित होते हा प्रश्न उद्भवतो.

## क्रयवस्तूची किंमत कशी ठरली जाते ?

विक्री करणाऱ्या आणि खरेदी करणाऱ्या लोकांमधील चढाओढीमुळें, किंवा क्रयवस्तूंचा पुरवठा आणि क्रयवस्तूंकरता मागणी यामधील विशिष्ट प्रमाणामुळें, क्रयवस्तूंची किंमत ठरविली जाते. ज्या चढाओढीमुळें क्रयवस्तूंची किंमत ठरविली जाते ती चढाओढ तीन प्रकारची असते.

( १ ) अनेक दुकानदार एकाच प्रकारची क्रयवस्तू विक्रीला ठेवतात. सारख्याच मोलाची क्रयवस्तू जो दुकानदार इतरांहून स्वस्तांत देतो, तो इतर दुकानदारांना चीत केल्याशिवाय राहणार नाहीं; आणि त्याचाच माल सर्वांहून अधिक खपेल. याप्रमाणें बाजारांत दुकानदार दुकानदारांमध्यें चढाओढ चालू असते. प्रत्येक दुकानदाराची इच्छा अशीच असते कीं आपला माल जास्तींत जास्त खपावा—शक्यतर इतरांना वगळून आपला एकट्याचाच खपावा! याचसाठीं दुकानदारांमध्यें स्वस्तांत स्वस्त माल विकण्याची चढाओढ चालू असते. साहाजिकपणेंच या चढाओढीचा कल क्रयवस्तूंची किंमत उतरविण्याकडे असतो.

( २ ) परंतु गिऱ्हाइकांमध्येंहि चढाओढ चालू असते. पण गिऱ्हाइकांच्या चढाओढीचा रोख क्रयवस्तूंची किंमत चढविण्याकडे असतो.

(३) शिवाय, दुकानदार व गिऱ्हाईक यांच्यामध्येंहि चढाओढ असते. आपसांतली चढाओढ सांभाळून आपला माल गिऱ्हाइकांना जास्तींत जास्त किंमतीला विकण्याची पराकाष्ठा दुकानदार करीत असतात; व स्वस्तांत स्वस्त खरेदी करण्याची धडपड गिऱ्हाइकांमध्यें चालू असते. या चढाओढीचा परिणाम, वर दिलेल्या दोन प्रकारच्या चढाओढींच्या परस्पर

प्रमाणावर अवलंबून असतो. दुकानदारांतली आपसांतली चढाओढ अधिक आहे कीं गिऱ्हाइकांमधील आपसांतली चढाओढ अधिक आहे यावरच तिसऱ्या प्रकारच्या, म्हणजे दुकानदार व गिऱ्हाइकांमधील, चढाओढीचें प्रमाण अवलंबून राहील. दुकानदारांची फौज विरुद्ध गिऱ्हाइकांची फौज, अशा दोन परस्परविरोधी फौजा उद्योगधंद्यामुळें निर्माण होतात. परंतु या फौजांमध्यें आपापसांतहि यादवी चालू असते. अर्थातच ही आपसांतली यादवी ज्या फौजेंत कमी त्या फौजेला अखेर दुसऱ्या फौजेविरुद्ध जय मिळतो.

आपण असें समजूं कीं १०० कापसाचे गठ्ठे बाजारांत विक्रीसाठीं पडून आहेत; त्याचप्रमाणें १००० गठ्ठे खरेदी करण्याची गिऱ्हाइकांची तयारी आहे, असेंहि आपण समजूं. या ठिकाणीं मागणीचें प्रमाण पुरवठ्याच्या दसपट आहे. अर्थातच गिऱ्हाइकांच्या सैन्यांत अधिक तीव्र यादवी माजणार. प्रत्येक गिऱ्हाइकाला निदान एखादा तरी गठ्ठा पाहिजे; आणि शक्यतर सर्वच पाहिजेत! हें उदाहरण कांहीं काल्पनिक नाहीं. कापसाचें पीक नासल्यामुळें कापसाची जेव्हां टंचाई पडली तेव्हां मूठभर भांडवलदारांनीं १०० गठ्ठेच काय पण जगांतील सर्व कापूस खरेदी करण्याचें ठरविल्याची उदाहरणें आपल्याला व्यापाराच्या इतिहासांत अनेक आढळ-

तात. साहजिकपणेंच वर दिलेल्या परिस्थितींत प्रत्येक गिऱ्हाईक इतरांहून जास्त किंमत देऊं करून, इतर गिऱ्हाइकांना परतविण्याचा प्रयत्न करील. अर्थातच विरुद्ध पक्षांतील ही खळबळ पाहून १०० गट्ठे विकणारे दुकानदार मनाशीं म्हणतील:–"आपले सर्व गट्ठे संपणार यांत शंकाच नाहीं; शिवाय गिऱ्हाईक एकमेकांच्या उरावर बसून किंमत चढवीत आहेत! अशा वेळीं आपसांतली यादवी बंद करणेंच इष्ट! उगाच चढत्या किंमतीला खीळ कशाला घाला?" साहजिकपणेंच दुकानदारांच्या फौजेंत यादवी न माजतां सलोखा नांदूं लागतो. दुकानदार गिऱ्हाइकांच्या फौजेला एकजुटीनें तोंड देण्याकरतां ऐटींत खडे होतात. अशा परिस्थितींत, जर अगदीं उधळ्या गिऱ्हाइकांच्या खर्चिकपणालाहि विशिष्ट मर्यादा नसती तर दुकानदारबहादूर १०० गट्ठ्यांवर केवढा प्रचंड फायदा मारतील याला सीमाच राहिली नसती.

याप्रमाणें एखाद्या क्रयवस्तूची मागणी तिच्या पुरवठ्याहून अधिक असेल तर दुकानदारांत उगीच नांवाला चढाओढ होईल–कदाचित होणारहि नाहीं. ज्या मानानें दुकानदारांतली चढाओढ कमी असेल त्यामानानें गिऱ्हाइकांतली चढाओढ अधिक तीव्र होईल. याचा परिणाम काय होईल? क्रयवस्तूची किंमत कमजास्त प्रमाणांत वर चढेल.

परंतु बहुधा याच्या उलट प्रकारच अधिक आढळतो, हें सर्वांना ठाऊक आहे. मागणीपेक्षां पुरवठा खूप जास्त अशीच सामान्य परिस्थिति असते; यामुळें गिऱ्हाइकांचा तुटवडा, दुकानदारांत हमरीतुमरीची चढाओढ, व नाइलाजास्तव क्रयवस्तूंची भलत्याच स्वस्त किंमतीला विक्री, अशी स्थिति प्राप्त होते.

पण किंमत चढते व उतरते असें आपण म्हणतो त्याचा तरी अर्थ काय ? चढलेल्या किंमती अगर उतरलेल्या किंमती याचा अर्थ काय ? सूक्ष्मदर्शक यंत्रांतून पाहिल्यास वाळूचा कणदेखील उंचच उंच दिसेल; आणि पर्वताशी तुलना करतां एखादा उंच बुरूजदेखील ठेंगणा वाटेल ! आणि जर क्रयवस्तूंची किंमत, मागणी व पुरवठा यांच्या परस्परप्रमाणामुळें ठरविली जात असेल तर मागणी व पुरवठा यांचें प्रमाण कशामुळें ठरविलें जातें, हा प्रश्न उरतोच.

आपणाला भेटणाऱ्या पहिल्याच इसमाजवळ आपण चौकशी करूं. तो थोडावेळ देखील विचार न करतां नेहमींच्या ठोकताळ्यांत जबाब देऊन मोकळा होईल. " मी विकत असलेल्या क्रयवस्तूचा पैदासखर्च १०० रु. पडला असून विक्रीमुळें जर मला ११० रु. मिळाले तर मला योग्य तोच फायदा मिळाला असें मी म्हणेन. परंतु विक्रीमुळें मला जर

१२० किंवा १३० रु. मिळाले तर मला नेहमींपेक्षां जरा फाजील फायदा झाला असें मी म्हणेन; आणि विक्रीमुळें जर मला २०० रु. मिळाले तर मात्र मला भलताच जास्त फायदा झाला असें उघड उघड म्हणावें लागेल." हा इसम फायद्याबद्दल "योग्य" "फाजील" अगर "भलताच जास्त" असें जें बोलला त्याचा अर्थ काय? फायद्याचें प्रमाण कोणत्या **मापाच्या** आधारानें ठरवावयाचें? त्या इसमाजवळील क्रयवस्तूच्या पैदासखर्चाच्या आधारानें. आपणाला भेटलेल्या इसमाला विक्रीनंतर १०० रुपयांहून कमी रक्कम मिळाली तर त्याचा तोटा झाला असें आपण म्हणूं; आणि त्याला १०० रुपयांहून अधिक रक्कम मिळाली तर त्याचा फायदा झाला असें म्हणूं. यावरून हें उघड दिसतें कीं, आपला इसम फायद्याचे कमी अधिक प्रमाण ठरवितो तें स्वतःजवळील क्रयवस्तूच्या **पैदासखर्चाच्या आधारानें** ठरवितो.

मागणी व पुरवठा यांमधील परस्परप्रमाणांत बदल झाल्यामुळें क्रयवस्तूंच्या किंमतींत चढ उतार कसा घडून येतो हें आपण पाहिलेंच आहे. पुरवठा कमी पडल्यामुळें अगर मागणींत प्रमाणाबाहेर वाढ झाल्यानें क्रयवस्तूंची किंमत चढते. याचाच अर्थ असा कीं दुसऱ्या कोणत्या तरी क्रयवस्तूंची किंमत

तुलनात्मक दृष्टीनें उतरते. कारण, कोणत्याहि क्रयवस्तूची किंमत म्हणजे तरी काय? तर त्या क्रयवस्तूची इतर निरनिराळ्या क्रयवस्तूंशीं ज्या प्रमाणांत देवघेव होते, त्या प्रमाणाची पैशाच्या रूपांत केलेली मोजणी. उदाहरणार्थ, एक वार रेशमी कापडाची किंमत ५ रुपयापासून ६ रुपयावर गेली, याचा अर्थ असा कीं, रेशमी कापडाशीं तुलना करतां रुपया या क्रयवस्तूची किंमत त्या मानानें उतरली. त्याचप्रमाणें जुन्याच भावानें मिळणाऱ्या इतर सर्व क्रयवस्तूंची किंमत रेशमी कापडाशीं तुलना करतां उतरेल हें उघड आहे. पूर्वी एक वार रेशमी कापड घेण्यासाठीं, ज्या प्रमाणांत इतर क्रयवस्तू द्याव्या लागत त्याहून आतां, म्हणजे रेशमी कापडाची किंमत वाढली असतां, जास्त द्याव्या लागतील. बरें एखाद्या क्रयवस्तूची किंमत चढल्याचा परिणाम काय होईल? ती क्रयवस्तु बनविण्याचा धंदा अधिक किफायतशीर ठरल्यामुळें, अधिकाधिक भांडवलदार त्या धंद्यांत पैसे घालूं लागतील. आणि किफायतीचा दर नेहमींच्या भावावर येईपर्यंत, किंबहुना त्या क्रयवस्तूचें अत्युत्पादन (फाजील पैदास Overproduction) होऊन तिची किंमत पैदास खर्चाच्याहि खालीं जाईपर्यंत, त्या धंद्याकडील भांडवलदारांची ओढ थांबणार नाहीं.

याच्या उलट जर एखाद्या क्रयवस्तूची किंमत तिच्या पैदासखर्चाच्याहि खाली उतरली तर ती क्रयवस्तु बनविणाऱ्या धंद्यांतील भांडवल काढून घेण्यास सुरवात होईल; ती क्रयवस्तु समाजाच्या दृष्टीनें निरुपयोगी ठरल्यास तिची पैदास अजिबात रसातळाला जाईल. पण असें नसेल तर भांडवल काढून घेतलें गेल्यामुळें त्या क्रयवस्तूचें उत्पादन इतकें कमी केलें जाईल कीं फिरून मागणीच्या मानानें पुरवठा अपुरा पडूं लागेल व त्या क्रयवस्तूची किंमत पैदासखर्चाच्या बरोबरीला येऊन भिडेल; इतकेंच नव्हे तर त्याहून वरीच वर चढेल; कारण क्रयवस्तूंची **चालू किंमत ही नेहमीं पैदासखर्चाच्या खालीं तरी असते अगर वर तरी असते.**

भांडवलाची या धंद्यांतून त्या धंद्यांत अशी अखंडपणें जा ये कशी चालू असते हें आपण पाहतोंच. कोणत्याहि धंद्यांत वाढत्या किंमतीमुळें वाजवीपेक्षां फाजील भांडवल ओढलें जातें; आणि उतरत्या किंमतीमुळें कोणत्याहि धंद्यांतून वाजवीपेक्षां फाजील भांडवल काढून घेतलें जातें.

कोणत्याहि क्रयवस्तूच्या पुरवठ्याचें प्रमाण त्या क्रयवस्तूच्या पैदासखर्चामुळें ठरविलें जातें; इतकेंच नव्हे तर मागणीचेंहि प्रमाण पैदास खर्चामुळेंच ठरविलें जातें, हें आणखी एका तऱ्हेनें आपणाला दाखवितां येईल. परंतु यासाठीं मूळ विषय सोडून आपणाला बरेंच दूर जावें लागेल.

मागणी आणि पुरवठा यांच्या हेलकाव्यामुळें (fluctuation) कोणत्याहि क्रयवस्तूची किंमत तिच्या पैदासखर्चाच्या बरोबरीला कशी आणली जाते हें आपण पाहिलेंच. वास्तविक पाहतां, कोणत्याही क्रयवस्तूची चालू किंमत पैदासखर्चाच्या वर तरी असते अगर खालीं तरी असते. परंतु चढत्या किंमतीच्या आंदोलनांची व उतरत्या किंमतीच्या आंदोलनांची नेहमीं फिटंफाट होते; व म्हणूनच एखाद्या धंद्यांतील तेजी-मंदीची आंदोलनें ध्यानांत घेऊन कांहीं ठराविक कालमर्यादेचा विचार केल्यास क्रयवस्तूंच्या देवघेवींचें प्रमाण त्यांच्या पैदासखर्चावर आधारभूत झाल्याचें आढळून येतें; अशा रीतीनें पैदासखर्चामुळेंच क्रयवस्तूंची किंमत ठरविली जाते, हें उघड आहे.

पैदासखर्चामुळें किंमती ठरविल्या जातात असें जें मी म्हटलें तें भांडवलदारी अर्थशास्त्रज्ञांच्या अर्थानें नव्हे. अर्थशास्त्रज्ञ म्हणतात कीं क्रयवस्तूंची सरासरी किंमत त्यांच्या पैदासखर्चाबरोबर असते; व हाच वास्तविक नियम होय, असें ते ठांसून सांगतात. एकमेकांची फिटंफाट करणारी चढत्या आणि उतरत्या किंमतींचीं आंदोलनें म्हणजे केवळ अपघात अगर विकृति आहे असें भांडवलदारी अर्थशास्त्रज्ञ मानतात. भांडवलदारी अर्थशास्त्रज्ञांप्रमाणें सारासार विचारच

सोडून द्यावयाचा झाला तर आपणाला असेंहि म्हणतां येईल कीं चढत्या उतरत्या किंमतींचीं आंदोलनें चालू राहणें हाच वास्तविक नियम, व पैदासखर्चामुळें किंमत निश्चित केली जाणें हा अपघात होय! परंतु ह्याच आंदोलनांची अधिक बारकाईनें पाहणी केल्यास आपणाला स्पष्ट दिसून येईल कीं याच आंदोलनांमुळें समाजाचा सांगाडा खिळखिळा करून टाकणारे भयंकर प्रसंग ओढवतात, आणि भांडवलशाही समाजरचनेचा पायाच गदगदा हादरला जातो. या आंदोलनांच्याच क्रमांमुळें पैदासखर्चाकरवीं किंमत निश्चित केली जाते. या बेबंदशाहीच्या समग्रतेंतच एक नियमितपणाचा धागा आढळतो. भांडवलशाही उत्पादनामधील बेबंदशाही चालू असतां, अगर भांडवलशाही उत्पादनाची ही भरती ओहोटी चालू असतां, चढाओढीमुळें एका अतिरेकाची दुसऱ्या विरोधी अतिरेकानें भरपाई केली जाते.

पैदासखर्चामुळें क्रयवस्तूंची किंमत ठरविली जाते, ती अशा रीतीनें कीं, ज्या कालमर्यादेंत क्रयवस्तूंच्या किंमती पैदासखर्चाच्या वर चढतात व ज्या कालमर्यादेंत त्या खालीं उतरतात या दोन्ही कालमर्यादा परस्परांस तोलून धरतात; हें आपण येथवर पाहिलें. अर्थातच ही परिस्थिति एकट्यादुकट्या क्रयवस्तूच्या पैदाशीच्या बाबतींत लागू नाहीं, तर सर्व

उद्योगधंद्यांच्या समग्र पैदाशीला लागू पडते. त्याचप्रमाणें ही परिस्थिति एकट्यादुकट्या कारखानदाराला लागू पडत नाहीं तर समग्र कारखानदारवर्गाला लागू पडते.

पैदासखर्चामुळें क्रयवस्तूंची किंमत निश्चित केली जाते, याचाच अर्थ असा कीं, क्रयवस्तूंच्या पैदाशीकरितां जो श्रमकाल ( labour-time ) जरूर असतो, त्यामुळें किंमत ठरविली जाते. कारण, क्रयवस्तूंचा पैदासखर्च खालील घटकांचा बनलेला असतोः—( १ ) कच्चा माल व उत्पादन-सामुग्रीची मोडतोड व झीज; हा कच्चा माल व ही उत्पादन-सामुग्री पैदा करण्यासाठीं कांहीं कामाचे दिवस खर्ची पडलेले असतात; आणि म्हणून कच्चा माल व उत्पादनसामुग्रीची मोडतोड व झीज यांची श्रम-कालाच्या परिमाणानें मोजणी होऊं शकते. ( २ ) पैदास खर्चाचा दुसरा घटक म्हणजे प्रत्यक्ष कामगाराचे श्रम; हे श्रमदेखील काल-परिमाणानेंच मोजले जातात. याप्रमाणें पैदासखर्च म्हणजेच पैदाशीखातर जरूर असा श्रम-काल हें स्पष्ट होतें.

ज्या सर्वसाधारण नियमानुसार सर्व क्रयवस्तूंच्या किंमतीचें नियमन केलें जातें, त्याच नियमानुसार मजुरीचें, म्हणजेच **श्रम-शक्तीच्या** किंमतीचें, नियमन केलें जातें.

मागणी आणि पुरवठा यांच्या परस्पर प्रमाणानुसार, म्हणजेच श्रम-शक्ति खरेदी करणारा भांडवलदारवर्ग व श्रम-शक्ति विकणारा कामगारवर्ग यांच्यामधील चढाओढीच्या विशिष्ट स्वरूपानुसार, कामगारांचे पगार चढतील अगर काटले जातील. श्रम-शक्तीच्या किंमतींतील आंदोलनांची व सर्व-सामान्य क्रयवस्तूंच्या किंमतींतील आंदोलनांची सांगड जमते. परंतु या आंदोलनांच्या मर्यादित कक्षेच्या आंत श्रम-शक्तीची किंमत तिच्या पैदासखर्चानेंच निश्चित केली जाईल—म्हणजेच श्रम-शक्ति ही क्रयवस्तु पैदा करण्यासाठीं जरूर अशा श्रम-कालावरून ठरविली जाईल.

पण श्रम-शक्तीचा पैदासखर्च म्हणजे काय ?

कामगाराला कामगार या दृष्टीनें जिवंत राखण्यासाठीं आणि कामाचें शिक्षण घेण्यासाठीं जो खर्च पडतो तोच श्रम-शक्तीचा पैदासखर्च होय.

अर्थातच ज्या मानानें एखाद्या कामासाठीं लागणारें शिक्षण कमी, त्यामानानें त्या कामाखातर कामगार पैदा करण्याचा खर्च कमी; आणि त्याचमानानें अशा कामगाराच्या श्रम-शक्तीची किंमत कमी—म्हणजेच अशा कामगाराची मजूरी कमी. बऱ्याचशा औद्योगिक शाखांत काम करण्यासाठीं विशेष शिकवणुकीची जरूर पडत नाहीं; आणि कामगार-

वर्गांतला कोणीहि हाडामांसाचा जिवंत प्राणी खपूं शकतो. अशा ठिकाणीं, कामगाराला पैदा करण्याचा खर्च, त्याला केवळ जगूनवाचून हातपाय हालवितां यावे म्हणून पोटापाण्यासाठीं ज्या क्रयवस्तू लागतात, त्यांच्या किंमतीइतकाच असतो. याप्रमाणें **अशा कामगाराच्या श्रम-शक्तीची किंमत त्याच्या पोटापाण्यासाठीं लागणाऱ्या ह्या साधनांच्या किंमतीमुळें निश्चित केली जाईल.**

परंतु आणखी एका गोष्टीचा विचार करणें जरूर आहे. कारखानदार पैदासखर्चाची मोजणी करतो व त्यामानानें तयार क्रयवस्तूंच्या किंमती आकारतो; पण असें करतांना त्याला उत्पादन सामुग्रीची मोडतोड व झीजहि ध्यानांत ध्यावी लागते. एखादें यंत्र ५०० रु. किंमतीला घेतलें असून तें १० वर्षांत निकामी होणार असल्यास, तो आपल्या मालाच्या किंमतींत दरवर्षीं ५० रुपयांची भर घालतो; कारण असें केल्यानें १० वर्षांनंतर त्याला निकामी यंत्राऐवजीं नवीन यंत्र पुनः घेतां येतें. त्याचप्रमाणें, म्हातारपणामुळें, व अखंड वापरामुळें निकामी होणाऱ्या कामगारांना रस्त्यावर घालवून दिल्यानंतर, त्यांची जागा घ्यावयास कामगारांची नवीन पिढी तयार असणें जरूर असतें. कामगारवर्गाला अशा नवीन पिढीला जन्म देतां यावा म्हणून प्रजोत्पादनाचा खर्चहि श्रम-

शक्तीच्या किंमतींत धरला गेलाच पाहिजे. याप्रमाणें हाडा-मांसाच्या कामगाराची झीज निर्जीव यंत्राच्या झिजेप्रमाणेंच मोजण्यांत येते.

याप्रमाणें, श्रम-शक्तीचा पैदासखर्च म्हणजे कामगाराच्या जीवनासाठीं आणि पुनरुत्पत्तीसाठीं लागणारा खर्च ठरतो. जगूनवाचून राहण्यासाठीं, व प्रजोत्पादन करण्यास समर्थ होण्यासाठीं, कामगाराला ज्या क्रयवस्तू वापरावयास मिळतात त्यांची किंमत म्हणजेच कामगाराची मजूरी. याप्रमाणें निश्चित झालेल्या मजूरीला **किमान-मजूरी** ( minimum wage ) म्हणतात; पैदास खर्चामुळें किंमत निश्चित केली जाते हें दाखवितांना आपण एकट्या दुकट्या क्रयवस्तूचा विचार केला नाहीं; तर सर्व क्रयवस्तूंचा समुच्चितपणें विचार केला. त्याच-प्रमाणें या किमान-मजुरीचा विचार करीत असतां एकट्या दुकट्या कामगाराकडे लक्ष न देतां समग्र कामगारवर्गाची मिळकत विचारांत घ्यावी लागेत. वैयक्तिक कामगारांना, किंबहुना लाखो कामगारांना, केवळ जगून वाचून राहण्या-पुरतीहि मिळकत होत नाहीं; मग लग्न व प्रजोत्पादन तर दूरच राहो; परंतु सर्व कामगारवर्गाच्या समग्र मिळकतीचा विचार करतां तिचा या किमान-मजूरीशीं मेळ बसतो.

इतर सर्व क्रयवस्तूंच्या किंमतींचे व तसेच श्रम-शक्तीच्या किंमतीचें ( मजूरीचें ) नियंत्रण करणारे अगदीं सर्वसाधारण नियम आतां आपल्या ध्यानांत आले; यापुढें आपल्या विषयाचा आपण अधिक बारकाईनें विचार करूं.

नवीन कच्चा माल, नवीन उत्पादनसामुग्री, आणि नवीन जीवित-साधनें पैदा करण्यासाठीं ज्या कच्च्या मालाची, उत्पादनसामुग्रीची व जीवित-साधनांची योजना केली जाते, त्या सर्वांना भांडवल म्हणतात. भांडवलाचे हे सर्व घटक कामगारांच्या श्रमामुळें निर्माण केले जातात,त्यांच्या श्रमापासून पैदा होतात. किंबहुना भांडवलाचे हे घटक म्हणजे **संचित-श्रम** ( stored up labour ) होय. नवीन उत्पादनाच्या कामीं योजला जाणारा संचित-श्रम म्हणजेच भांडवल, असें अर्थशास्त्रज्ञ म्हणतात !

शिद्दी गुलाम म्हणजे कोण ? काळ्या जातीचा मनुष्य. शिद्दी गुलामाची ही व्याख्या, व वर सांगितलेली भांडवलाची व्याख्या, या दोन्ही सारख्याच लायकीच्या आहेत.

शिद्दी म्हणजे शिद्दीच; परतु तो गुलाम बनतो तो कांहीं विशिष्ट सामाजिक परिस्थितींतच बनतो. त्याचप्रमाणें कापसाचें सूत कातण्याचें यंत्र म्हणजे कापसापासून सूत काढण्याचें यंत्रच; परंतु हें यंत्र भांडवल बनतें तें कांहीं विशिष्ट सामाजिक

परिस्थितींतच बनतें. विशिष्ट सामाजिक परिस्थितीपासून अलग तोडून काढल्यास स्वतः सोन्याला जसा पैसा ( money ) या दृष्टीनें मोल रहात नाहीं, किंवा, साखरेचा व साखरेच्या किंमतीचा जसा कांहीं संबंध रहात नाहीं, त्याचप्रमाणें ठराविक सामाजिक परिस्थितीपासून तोडून अलग केलेल्या यंत्राला भांडवल या दृष्टीनें अस्तित्व रहात नाहीं. उत्पादन करतांना माणसांचा संबंध केवळ निसर्गाशींच येतो असें नसून त्यांचा परस्परांशीहि संबंध येतो. कांहीं ठराविक पद्धतीनें एकत्र काम करून आपल्या व्यवसायांची परस्पर देवघेव करूनच त्यांना उत्पादन करणें शक्य होतें. उत्पादन करण्याकरतां माणसांना कांहीं ठराविक परिस्थितींत, ठराविक संबंधांनीं परस्परांशीं बांधलें जावें लागतें. आणि या सामाजिक परिस्थितीच्या व संबंधांच्या मर्यादित कक्षेंतच मानवी श्रमांचा निसर्गावर परिणाम होऊं शकतो व या कक्षेंतच उत्पादन करणें शक्य होतें.

उत्पादकांमधील हे परस्परसंबंध, आणि ज्या सामाजिक परिस्थितींत ते आपल्या व्यवसायांची देवघेव करतात ती परिस्थिती, यामध्यें उत्पादन सामुग्रीच्या विशिष्ट धर्तीनुसार पालट होत जातो. बंदुकीचा शोध लागतांच सैन्यांची अंतर्व्यवस्था अपरिहार्यपणें बदलावी लागली. पूर्वीं ज्या धर्तीनुसार

हरएक शिपाई सैन्याचा घटक बने, ती धर्ती बदलावी लागली आणि निरानिराळ्या सैन्यांमधील परस्परसंबंधांतहि फेरफार करावे लागले.

त्याचप्रमाणें ज्या सामाजिक संबंधांच्या कक्षेंत व्यक्ती उत्पादनाचें कार्य करतात, ते सामाजिक संबंध, म्हणजेच **समाजांतील उत्पादन संबंध,** उत्पादनशक्तीच्या म्हणजेच जड **उत्पादनसामुग्रीच्या** होणाऱ्या **विकासाबरोबर बदलत जातात. ज्याला आपण सामाजिक संबंध अगर समाज म्हणतो त्याचें विशिष्ट स्वरूप समग्र उत्पादनसंबंधामुळेंच ठरविलें जातें. आणि ऐतिहासिक उत्क्रांतीच्या विशिष्ट अवस्थेंत अस्तित्वांत येणाऱ्या विवक्षित धर्तीच्या समाजाचे स्वरूपहि त्या अवस्थेंतील समग्र उत्पादन संबंधामुळेंच निश्चित केलें जातें. प्राचीन** ( ancient ) **समाज, सरंजामदारी** ( Feudal ) **समाज, भांडवलदारी** ( bourgeois ) **समाज,** वगैरे मानवी समाजाच्या भिन्न अवस्था म्हणजे भिन्न धर्तीचे समग्र उत्पादन-संबंधच होत. आणि या समग्र उत्पादन-संबंधाची हरएक भिन्न धर्ति, अगर हरएक भिन्न उत्पादन-पद्धति, म्हणजेच मानवी इतिहासाच्या उत्क्रांतीतील हरएक भिन्न अवस्था होय.

**भांडवल** हें देखील एका ठराविक उत्पादन-पद्धतींतील सामाजिक संबंधाचें द्योतक आहे. **भांडवलशाही उत्पादन-पद्धतींतच** भांडवल अस्तित्वांत येऊं शकतें. ज्या कच्च्या मालाचें, ज्या जीवित साधनांचें व ज्या श्रम-साधनांचें भांडवल बनतें तीं साधनें कांहीं ठराविक धर्तीच्या सामाजिक परिस्थितींतच पैदा करण्यांत येत नाहींत काय, अगर साठविण्यांत येत नाहींत काय? आणि विशिष्ट सामाजिक पद्धतीमुळेंच नवीन पैदाशीसाठीं उपयोगी पडणाऱ्या या साधनांना भांडवलाचें स्वरूप येत नाहीं काय?

जीवित साधनें, श्रमाची साधनें, अगर कच्चा माल यांचेंच केवळ भांडवल बनलेलें नसतें; किंवा तें केवळ जड वस्तूंचेंच बनलेलें असतें असेंहि नाहीं. तें जसें या साधनांचें बनलेलें असतें, तितकेंच तें **विक्रय-मोलाचेंहि** बनलेलें असतें. भांडवल ज्या निरनिराळ्या घटकांचें बनलेलें असतें, ते सर्व घटक क्रयवस्तू या सदराखालीं येतात. यावरून हें उघड होतें कीं भांडवल म्हणजे केवळ जड वस्तूंचा साठा नसून तो क्रयवस्तूंचा साठा असतो, विक्रय–मोलाचा साठा असतो; म्हणजेच तो **सामाजिक परिमाणांचा** (Social Magnitudes) साठा असतो विक्रयमोल सारखाच असेल तर, लोकरीऐवजीं कापूस, ज्वारीऐवजीं तांदूळ, आगगाड्यांच्या

ऐवजीं जहाजें, याप्रमाणें भांडवलाच्या बाह्य स्वरूपांत कशीहि अदलाबदल केली तरी भांडवलांत कांहींएक फेरफार होत नाहीं-ते जसेंच्या तसेंच राहतें. भांडवलाच्या जड स्वरूपांत अखंडपणें बदल होत राहिला, तरी भांडवलांत थोडादेखील फेरफार होणार नाहीं.

**सर्व भांडवल क्रयवस्तूंच्या संचयाचें अगर विक्रय मोलांच्या संचयाचें बनलेलें असतें; पण यावरून आपणाला असें म्हणतां येणार नाहीं कीं क्रयवस्तूंचे अगर विक्रयमोलांचे सर्वच संचय भांडवल असतात.**

विक्रय-मोलाच्या अनेक लहान भागांची बेरीज ही एक पूर्ण विक्रय मोल होऊं शकते. आणि विक्रयमोलाच्या एका परिमाणाचे अनेक छोटया विक्रय-मोलांत भाग पडूं शकतात. उदाहरणार्थ, हजार रुपये मोलाचें घर म्हणजे एक रुपया मोलाच्या हजार भागांची बेरीज होय. त्याचप्रमाणें एक पैसा मोलाचा कागद म्हणजेच एक पन्नासांश पैशाच्या पन्नास भागांच्या मोलाचा कागद होय. ज्या वस्तूंची दुसऱ्या वस्तूं-बद्दल देवघेव होऊं शकते त्या वस्तूंना **क्रयवस्तू** म्हणतात. ज्या ठराविक प्रमाणांत क्रयवस्तूंची देवघेव होते तें प्रमाण म्हणजेच **विक्रय मोल**; आणि हें प्रमाण पैशांत व्यक्त केलें की त्याला **किंमत** म्हणतात. क्रयवस्तूंच्या संख्येंत अगर

परिमाणांत कसाहि फेरफार केला तरी त्यांच्या अंगच्या **क्रयवस्तूपणांत** कांहीं देखील फरक होत नाहीं, म्हणजे **विक्रयमोल** अंगीं बाळगण्याचा किंवा कांहीं **ठराविक किंमतीला** विकलें जाण्याचा जो गुण त्यांच्या ठिकाणीं असतो त्यांत फरक होत नाहीं. झाड मोठें असो किंवा लहान असो तें झाड तें झाडच राहतें. त्याचप्रमाणें क्रयवस्तूचे परिमाण जास्त असो अगर कमी असो, ती क्रयवस्तु क्रयवस्तूच राहते. आपण लोखंडाची इतर क्रयवस्तूंशीं देवघेव करतों ती शेरांत केली काय अगर मणांत केली काय, त्यामुळें लोखंडाच्या ठिकाणीं जो क्रयवस्तूपणा आहे त्यांत कांहीं देखील फरक होत नाहीं;विक्रयमोल अंगीं बाळगणारा एक पदार्थ यादृष्टीनें लोखंडांत कांहींच फरक होत नाहीं. परिमाणाच्या कमजास्तपणानुसार त्या क्रयवस्तूचा मोल कमी अगर जास्त होऊं शकतो; किंवा तिची किंमत कमी अगर अधिक होऊं शकेल; पण ती क्रयवस्तु ही राहतेच.

क्रयवस्तूंच्या अगर विक्रय-मोलांच्या साठ्याचें भांडवलांत कसें रूपांतर होतें ?

क्रयवस्तूंच्या साठ्याचें भांडवलांत रूपांतर होतें तें अशा-मुळें, कीं एक स्वतंत्र सामाजिक शक्ति, अगर समाजांतील एका विभागाची शक्ति या नात्यानें क्रयवस्तूंचा साठा प्रत्यक्ष

जिवंत श्रम-शक्तीचे शोषण करून स्वतःला कायम राखतो, एवढेंच नव्हे तर स्वतःची वाढ करून घेतो. स्वतःच्या हाडामांसांतील श्रम-शक्तीखेरीज इतर कोणतींहि उपजीविकेचीं साधनें ज्याच्याजवळ नाहींत, असा कामगारवर्ग समाजांत असेल तरच भांडवल निर्माण होऊं शकतें. केवळ श्रम-शक्तीची विक्री करूनच जगूं शकणारा कामगारवर्ग समजांत नसेल तर भांडवलहि पैदा होऊं शकणार नाहीं.

पूर्वीं साठविलेल्या श्रमांचा अगर भूतकाळांतील संचित-श्रमाचा प्रत्यक्ष जिवंत श्रम-शक्तीवर जो अंमल चालतो, त्यामुळेंच संचित श्रमाला भांडवलाचें स्वरूप प्राप्त होतें.

नवीन उत्पादनाच्या कामीं जिवंत श्रम-शक्तीला, म्हणजेच कामगारवर्गाला, संचित श्रमाची (उत्पादन साधनांची) मदत होते म्हणून भांडवल निर्माण होतें, असें म्हणणें साफ चुकीचें होईल. उलटपक्षीं जिवंत श्रम-शक्तीच्या साह्यानें म्हणजेच कामगारवर्गाचे रक्त शोषण करून, श्रमसंचयाचा ( कच्चा मालाचा ) विक्रय मोल कायम राखला जातो व वाढविला जातो म्हणूनच भांडवल निर्माण होतें. भांडवलदार आणि कामगार यांची देवघेव होते त्यावेळीं वास्तविक काय घडतें ?

कामगाराला स्वतःची श्रम-शक्ती भांडवलदाराच्या हवालीं केल्याबद्दल पोटापाण्याची साधनें मिळतात. परंतु स्वतःजव-

ळील कांहीं पोटापाण्याचीं साधनें कामगाराला दिल्याबद्दल भांडवलदाराला कामगाराचे श्रम, कामगाराची माल पैदा करणारी ताकद—म्हणजेच सर्व क्रयवस्तू निर्माण करणारी शक्तिमत्ता—वापरावयास मिळते; यामुळें कामगार स्वतः वापरलेल्या पोटापाण्याच्या साधनांची भरपाइ तर करतोच, पण वर संचित-श्रमाच्या ( कच्च्या मालाच्या ) विक्रयमोलांत भर घालतो. कामगाराला भांडवलदाराकडून आधींच हजर असलेल्या साधनांतून कांहीं भाग पोटगी म्हणून मिळतो. या पोटगीचा कामगार काय उपयोग करतो ? कामगार ताबडतोब स्वतःच्या गरजा भागविण्याकरतां तिचा उपयोग करून मोकळा होतो. परंतु या पोटगीच्या उपयोगामुळें कामगार जितका वेळ जिवंत राहूं शकतो, त्या वेळांत त्यानें उद्यांच्या पोटगीची साधनें पैदा करून **वापरलेल्या** पोटगीची भरपाई केली नाहीं, तर तिला तो कायमचा मुकेल. आजच्या पोटगीचा व्यय चालू असतां उद्यांचीं उपजीविकेचीं साधनें पैदा करण्याची ही अमोल शक्ति—ही पुनरुत्पादनाची शक्तीच—तुटपुंजा मजूरीची फेड म्हणून कामगार भांडवलदाराच्या हवाली करतो. आणि म्हणूनच या श्रम-शक्तीवर त्याचा हक्क रहात नाहीं.

आपण एक उदाहरण घेऊं. एक जमीनदार आपल्या

शेत-कामगाराला आठ आणे रोजगार देतो असें समजूं. या आठ आण्यांची फेड म्हणून शेतकामगार सर्व दिवसभर जमीनदाराच्या शेतावर राबतो आणि जमीनदाराला एक रुपया मोबदला देतो असें धरून चालूं. यांत जमीनदारानें शेत-कामगाराला दिलेल्या आठ आण्याची भरपाई होते इतकेंच नव्हे तर वरकड आठ आण्याची भर जमीनदाराच्या खिशांत पडते. अर्थात्च जमीनदारानें शेतकामगाराच्या रोजगारादाखल जे आठ आणे खर्ची घातले ते फायदेशीर रीतीनें खर्ची घातले. आठ आणे देऊन त्यानें शेतकामगाराची श्रम-शक्ति विकत घेतली; या शक्तीनें आठ आण्याच्या दुप्पट मोलाचे धान्य पैदा केलें—जमीनदाराच्या आठ आण्याचें एक रुपयांत रूपांतर झालें. उलटपक्षीं शेतकामगारानें आपल्या श्रम-शक्तीमुळें पैदा झालेलें धान्य जमीनदाराला बहाल केलें व श्रम-शक्ति वापरावयास दिल्याबद्दल आठ आणे घेतले; हे आठ आणे शेत-कामगारानें साहजिकपणेंच ताबडतोब पोटापाण्यासाठीं खर्च केले. याप्रमाणें आठ आण्याचा दोन तऱ्हेनें व्यय झाला. जमीनदाराच्या अगर भांडवलाच्या दृष्टीनें आठ आणे किफायतशीरपणें खर्च झाले. कारण आठ आण्याला शेत-कामगाराची श्रम-शक्ती भाड्यानें घेऊन जमीनदाराच्या पदरांत एक रुपयाचा माल पडला.

पण शेतकामगाराच्या दृष्टीनें त्या आठ आण्याचा अगदीं **अनुत्पादकपणें** अगर **बिगर–किफायत** व्यय झाला. कारण त्या आठ आण्यावर त्यानें पोटापाण्याची साधनें आणलीं; व हीं साधनें व्यय करतांच कायमची नाश पावलीं. फिरून त्या मोलाची साधनें मिळविण्यासाठीं शेतकामगाराला पुनः आपली श्रम-शक्ति जमीनदाराच्या हवालीं करून राबणें भाग पडतें. म्हणजेच फिरून जमीनदाराच्या खिशांत वरकड आठ आण्याचा मोल टाकणें शेतकामगाराला भाग असते. **याप्रमाणें भांडवल पैदा होण्यास समाजांत पगारी कामगार असणें जरूर आहे; आणि पगारी–कामगार पैदा होण्यास भांडवल अस्तित्वांत असणें जरूर आहे. केवळ श्रम-शक्ति विकून जगणारा कामगारवर्ग नसेल, तर भांडवल पैदा होणार नाहीं. आणि भांडवल हजर नसेल तर मोलमजुरीहि निर्माण होणार नाहीं. भांडवल व मोलमजुरी एकमेकांना पैदा करतात; एकमेकामुळें एकमेक अस्तित्वांत येतात.**

कापसाच्या गिरणींतील कामगार फक्त कापसाचा मालच पैदा करतो काय ? नाहीं. तो भांडवल पैदा करतो. त्याच्या श्रम-शक्तीवर फिरून स्वामित्व गाजवून नवीन क्रयवस्तू पैदा करणाऱ्या मोलांची तो पैदास करतो.

भांडवल स्वतःची वाढ करूं शकतें तें केवळ, कामगारांच्या श्रम-शक्तींचें शोषण करूनच करूं शकतें; स्वतःच्या वाढीखातर भांडवलाला मोल-मजूरी अस्तित्वांत आणावी लागते. कामगाराची श्रम-शक्ति भांडवलाखातर राबूं शकते, ती एकाच अटीवरः ती अट म्हणजे भांडवलाची वाढ करणें—म्हणजेच ज्या शक्तीचा कामगार गुलाम असतो ती शक्ति—वाढविणें. याप्रमाणें **भांडवलाची वाढ म्हणजे कामगारांच्या संख्येची वाढ ठरते**—भांडवलाची वाढ कामगारवर्गाच्या फौजेंत भर टाकते.

भांडवलदार व कामगार या दोहोंचेहि हितसंबंध याप्रमाणें एकवटलेले असतात असें भांडवलदार व त्यांचे अर्थशास्त्रज्ञ ठासून सांगतात. आणि खरोखरच ते एकवटलेले असतात यांत शंका नाहीं ! भांडवलदारानें कामावर ठेवलें नाहीं तर कामगार उपाशी मरतो. आणि कामगाराच्या श्रम-शक्तीची पिळणूक केली नाहीं तर भांडवल नाश पावते. आणि पिळणुकीसाठीं श्रम-शक्ती विकत घेणें भांडवलदाराला भाग असतें. नवीन उत्पादनाखातर योजलेल्या भांडवलाची ज्या मानानें झपाट्यानें वाढ होते, त्याच मानानें उद्योगधंद्याची भरभराट होते; त्याच मानानें भांडवलदाराची श्रीमंती वाढते व व्यापारधंदा सुरळित चालूं लागतो; आणि त्याच मानानें अधिकाधिक

कामगार आपली श्रम-शक्ती विकूं शकतात. याप्रमाणें उत्पादक भांडवलाची जास्तींत जास्त वाढ झाली तरच कामगारांना कसेंबसें जगून वाचून राहतां येतें—व म्हणूनच **कामगाराला कसेंबसें जगून राहण्यासाठीं पहिली अट म्हणजे भांडवलाची अत्यंत झपाट्याची वाढ होत राहिली पाहिजे.**

परंतु, उत्पादक भांडवलाची वाढ म्हणजे काय ? उत्पादक भांडवलाची वाढ म्हणजे जिवंत श्रम-शक्तीवर संचित श्रमाकडून गाजविल्या जाणाऱ्या स्वामित्वाची वाढ; आणि म्हणजेच कामगारवर्गावरील भांडवलदारवर्गाच्या सत्तेची वाढ. जसजसा कामगार स्वतःवर हुकमत गाजविणारी परकीय संपत्ति निर्माण करतो; जसजसा कामगार स्वतःशीं वैर करणारें भांडवल पैदा करतो; तसतसा भांडवलातील कांहीं भाग पोटगीच्या रूपानें कामगाराला मिळत राहतो; पण तो एकाच अटीवर; ती अट ही कीं कामगारानें पुनः पुनः स्वतःच्या रक्ताचें पाणी करून दररोज भांडवलदाराच्या भांडवलांत भर टाकलीच पाहिजे, आणि अशा रीतीनें आपलें रक्त पिळून घेण्याची भांडवलदाराची सत्ता अधिकाअधिक वाढविलीच पाहिजे.

**भांडवलदाराचे व कामगाराचे हितसंबंध एकरूप असतात असें भांडवलशाही अर्थशास्त्रज्ञ म्हणतात त्याचा अर्थ इतकाच कीं भांडवल आणि पगारी-गुलामगिरी ही एकाच सामाजिक संबंधाची दोन अंगें आहेत. एकामुळें दुसऱ्याची मर्यादा निश्चित केली जाते, एक दुसऱ्यावर अवलंबून असतें; धनको आणि ऋणको एकमेकांवर अवलंबून असतात त्यांतलाच हा प्रकार.**

जोंपर्यंत कामगार हा पगारी-गुलाम असतो, तोंवर त्याचें सर्वस्व भांडवलावर अवलंबून असतें. भांडवलावर व कामगार यांच्या हितसंबंधाच्या एकरूपीपणाबद्दल भांडवलदारी अर्थशास्त्रज्ञ ज्या वल्गना करतात त्यांचा वास्तविक अर्थ येवढाच.

जर भांडवलाची वाढ झाली तर पगारी-गुलामांचा तांडाहि वाढत जातो—कामगारांची संख्याहि वाढत जाते. थोडक्यांत, भांडवलाच्या वाढीबरोबर भांडवलदारांची हुकमत अधिकाधिक कामगारभाईवर पसरत जाते. आणि भांडवलशाहीची जास्तींत जास्त चांगली अवस्था धरून चालल्यास असें म्हणतां येईल कीं जर उत्पादक भांडवलाची वाढ झाली तर त्यामुळें कामगारांच्या श्रम-शक्तीलाहि वाढती मागणी येईल आणि त्यामुळें मजूरीची म्हणजेच श्रम-शक्तीची किंमत वाढेल.

एखादें घर मोठें असो किंवा लहान असो; जोंपर्यंत शेजारचीं घरेंहि तितकींच लहान आहेत, तोंपर्यंत रहाण्याच्या वगैरे सामाजिक गरजा त्या घरावरच भागूं शकतात. परंतु त्या घराशेजारी एक राजवाडा उभारण्यात येतांच, तें घर एखाद्या खोपटाप्रमाणें भासूं लागतें. आतां त्या घराकडे पाहतांच त्या घरांत राहणाऱ्या इसमाला समाजांत अगदींच थोडा दर्जा आहे अगर मुळिच दर्जा नाहीं ही गोष्ट चवाठ्यावर येते. आणि भांडवलशाही सुधारणेच्या ओघाबरोबर तें घर कितीहि मोठे झालें, तरी जोपर्यंत शेजारच्या राजवाड्याचे मजले त्याच प्रमाणांत अगर त्याहून वाढत्या प्रमाणांत चढत राहतील, तोपर्यंत तुलनात्मक दृष्टीनें त्या लहान घरांत राहणाऱ्या इसमाला अधिकाधिक अस्वस्थता वाटूं लागेल-तो अधिकाधिक हवालदिल होत जाईल; आणि आपणाला खुजट अशा चार भिंताडांच्या आंत डांबून ठेवण्यांत आलेलें आहे ही त्याची भावना बळावत जाईल.

कामगारांच्या मजुरींत म्हणण्यासारखी वाढ व्हावयाची तर प्रथम उत्पादक भांडवलांत झपाट्यानें वाढ झाली पाहिजे. उत्पादक भांडवलाच्या जलद वाढीबरोबर संपत्ति, ऐषाराम, सामाजिक गरजा व सामाजिक करमणुकी यांचीहि वाढ झाल्यावांचून राहात नाहीं. याप्रमाणें कामगारवर्गाच्या

सुखसोयी कांहींशा वाढल्या असल्या तरी त्यांपासून लाभणारे सामाजिक समाधान भांडवलदाराच्या सुखसोयींमधील प्रचंड वाढीशीं तुलना केल्यानें एकसारखें कमी होत आलें आहे. एकंदर सामाजिक प्रगतीच्या ओघांत भांडवलदारवर्गाला ज्या प्रचंड सुखसोयी लाभत आल्या त्या मिळविणें कामगाराला कधींही शक्य झालें नाहीं. आपल्या गरजा व आपली सुखें हीं समाजापासून उगम पावतात. अर्थातच आपल्या पदरांत प्रत्यक्ष काय पडतें त्यावरून आपण समाधान मानूं शकत नाहीं. तर सुखसोयींच्या दृष्टीनें समाजानें जो पल्ला गांठला असेल त्याच्याशीं तुलना करून आपण समाधानाची मोजदात करतों. याप्रमाणें सुखसोयींचा व गरजांचा प्रश्न सामाजिक स्वरूपाचा आहे; आणि म्हणूनच तो तुलनात्मक स्वरूपाचा आहे.

यावरून हें उघड होतें कीं, मजूरीचा कमीअधिकपणा हा मजूरीचे पैसे खर्चून आपणाला ज्या क्रयवस्तू घेतां येतात त्या क्रयवस्तूंच्या साठ्यावरच केवळ अवलंबून नसतो. रोजगाराचा कमीअधीकपणा निरनिराळ्या सामाजिक संबंधावर अवलंबून असतो. कामगाराला श्रम-शक्ति वापरण्यास दिल्या-बद्दल प्रत्यक्ष काय मिळतें ? एक ठराविक पैशाची रक्कम मिळते. या रकमेवरून, या श्रम-शक्तीच्या किंमतीवरून,

मजूरांचा कमीजास्तपणा ठरविता येईल काय? नाहीं.

उदाहरणार्थ सोळाव्या शतकांत अमेरिकेंत अत्यंत समृद्ध व सुलभ अशा सोन्यारुप्याच्या खाणी सांपडल्यामुळें, युरोपमधील सोन्यारुप्याच्या चलनांत भर पडली. साहाजिकपणेंच इतर क्रयवस्तूंच्या मानानें सोन्यारुप्याचा मोल उतरला. परंतु कामगारांना त्यांच्या श्रम-शक्तीबद्दल पूर्वी इतकींच रुप्याचीं नाणीं मिळत राहिलीं—मजूरी म्हणून मिळणारी पैशाची रक्कम पूर्वीइतकीच कायम राहिली; पैशांत व्यक्त होणारी त्यांच्या श्रम—शक्तीची किंमत पूर्वीइतकीच कायम राहिली, पण वास्तविक त्यांचे पगार उतरले; कारण पूर्वीइतकीच रुप्याची नाणीं खर्चून आतां त्यांना पूर्वीपेक्षां कमी मोलाच्या क्रयवस्तू मिळूं लागल्या. अठराव्या शतकांत भांडवलाचा व भांडवलदारवर्गाचा विकास होण्यास ज्या गोष्टी कारणीभूत झाल्या त्यापैकीं ही एक होय.

आपण आणखी एक उदाहरण घेऊं. १८४७ सालच्या हिवाळ्यांत पिकाची नासाडी झाल्यामुळें धान्य, मांस, लोणी चीझ वगैरे अगदीं जीविताला आवश्यक अशा क्रयवस्तूंच्या किंमती प्रमाणाबाहेर चढल्या. कामगारांना मजुरी म्हणून मिळणारी पैशाची रक्कम पूर्वीइतकीच कायम राहिली, असें समजूं. अशा परिस्थितींत कामगारांचा मजूरी वास्तविक उत-

रली नाहीं का ? खात्रीनें उतरली. कारण पूर्वीइतकेच पैसे खर्च करून त्यांना आतां पूर्वीपेक्षां कमी मांस,कमी लोणी अगर कमी धान्य मिळूं लागलें. या उदाहरणांत त्यांची मजुरी उतरली ती रुप्याची किंमत पडल्यामुळें नव्हे तर जीविताला लागणाऱ्या क्रयवस्तूंच्या किंमती चढल्या म्हणून.

अखेर आपण तिसऱ्या प्रकारचें उदाहरण विचारांत घेऊं. श्रम-शक्तीची पैशांत व्यक्त होणारी किंमत तीच राहिली, म्हणजेच मजुरीदाखल मिळणारे पैसे तेच राहिले असें आपण समजूं; परंतु शेतकी पदार्थ व औद्योगिक पदार्थ अशा सर्वच क्रयवस्तूंच्या किंमती चांगल्या पिकामुळें व नवीन धर्तीच्या किफायतशीर यंत्राच्या योजनेमुळें उतरल्या असें धरूं. आतां याप्रमाणें सर्वच जिनसा सवंग झाल्यामुळें पूर्वीइतक्याच पैशांत कामगारांना अधिक क्रयवस्तू घेतां येऊं लागतील. अर्थातच मजुरीच्या पैशाची रक्कम तेवढीच राहिली, पण वास्तविक कामगारांची मिळकत वाढली; कामगारांच्या पदरांत पडणारी वास्तविक मजूरी वाढली.

यासाठीं कामगारांनीं हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं श्रम-शक्ती विकल्याबद्दल पैशांत मिळणारी किंमत अगर ज्याला आपण नेहमीं मजूरी अगर रोजगार म्हणतों ती पैशाची रक्कम म्हणजे कांहीं वास्तविक मजूरी नव्हे; किंवा

मजूरी म्हणून मिळणारे पैसे म्हणजे कांहीं ते पैसे खर्चून प्रत्यक्ष पदरांत पडणारा क्रयवस्तूंचा संचय नव्हे. एकच रक्कम खर्चून आज अधिक क्रयवस्तू मिळतील तर उद्या कमी मिळतील. यावरून हें उघड होतें कीं मजूरी उतरली अगर चढली याबद्दल विचार करतांना केवळ नामधारी पैशाच्या रकमेकडेच लक्ष देऊन भागणार नाहीं.

परंतु, ज्या रकमेला कामगार आपली श्रम-शक्ति भांडवलदाराच्या हवालीं करतो, ती नामधारी मजूरीची रक्कम, किंवा ही रक्कम खर्च करून कामगाराच्या पदरांत क्रयवस्तूंच्या रूपांत पडणारी वास्तविक मजूरी, या दोहोंबद्दलचा वर दिल्याप्रमाणें खुलासा करूनहि मजूरी या शब्दांत गर्भित असणाऱ्या सर्व सामाजिक धाग्यादोऱ्यांचा खुलासा होत नाहीं.

मजूरीचा कमजास्तपणा ठरविणारी सर्वांत अधिक महत्त्वाची गोष्ट कोणती असेल तर ती म्हणजे भांडवलदाराच्या घशांत पडणाऱ्या फायद्याशीं तुलना करतां त्याच्याशीं पडणारें मजूरीचें प्रमाण—तुलनात्मक मजूरी—ही होय. कामगाराच्या पदरांत पडणाऱ्या वास्तविक पगारावरून, इतर क्रयवस्तूंच्या किंमतीशीं श्रम-शक्तीच्या किंमतीचें काय प्रमाण पडतें याचा खुलासा होतो. उलटपक्षीं, वर दिलेल्या तुलनात्मक-मजूरीवरून, कामगाराच्या श्रमामुळें पैदा झालेल्या नवीन मोला-

मधून कामगाराच्या वांट्याला येणारा हिस्सा किती, व संचित-श्रमाच्या म्हणजेच भांडवलदाराच्या वांट्याला पडणारा हिस्सा किती याचा खुलासा होतो. तुलनात्मक मजूरीवरून कामगाराच्या मिळकतीचें भांडवलवाल्याच्या मिळकतीशीं पडणारें प्रमाण उघड होतें.

आपण वर एके ठिकाणीं असें म्हटलें कीं, कामगाराला जी मजूरी मिळते ती त्यानें बनविलेल्या नवीन क्रयवस्तूंच्या साठ्यांतून देण्यांत येत नाहीं; तर आधींच भांडवलदाराजवळ शिल्लक असणाऱ्या क्रयवस्तूंतील कांहीं भाग कामगाराला मजूरीदाखल देण्यांत येतो; व अशा रीतीनें भांडवलदार कामगाराची कांहीं उत्पादक श्रम-शक्ति विकत घेतो. परंतु कामगारानें बनविलेल्या क्रयवस्तूची विक्री करून जे पैसे येतात त्यांतून मजूरीदाखल खर्ची घातलेल्या रकमेची भरपाई करून घेतल्याशिवाय भांडवलदार रहात नाहीं; कामगारानें बनविलेल्या मालाची विक्री करून जे पैसे हातीं येतात त्यांतून आधीं दिलेल्या मजूरीची भरपाई करण्यासाठीं भांडवलदार अशाच बेतानें पैसे बाजूला काढतो कीं हे पैसे व इतर सर्व उत्पादन खर्च यांची भरती होऊन वर कांहीं फालतु मिळकत, कांहीं फायदा, नियमानें खिशांत पडावा. साहजिकपणेंच कामगारानें बनविलेला माल विकून येणाऱ्या

रकमेचे भांडवलदार तीन भाग पाडतो. **पहिला**, सर्व तऱ्हेचा कच्चा माल, यंत्राची झीज, व इतर कामाच्या हत्यारांचा खर्च भरून काढणारा भाग; **दुसरा**, मजुरीसाठीं खर्ची घातलेल्या रकमेची भरपाई करणारा भाग; आणि **तिसरा** भाग वरकड मिळकतीचा; हा तिसरा भाग म्हणजेच भांडवलदाराच्या घशांत जाणारा फायदा होय. यांतून पहिला भाग **आधींच तयार असणाऱ्या मोलांच्या** भरपाईसाठींच केवळ खर्ची पडतो. परंतु मजूरी-खर्चाची भरपाई व फायदा यांची निष्पत्ति कामगारानें कच्च्या मालावर परिश्रम करून जो नवीन मोल पैदा केलेला असतो त्यांतूनच होते हें स्पष्ट आहे. आणि या दृष्टीनें पाहतां मजुरी व फायदा यांची तुलना करतांना, हे कामगारांनीं पैदा केलेल्या नवीन मोलाचेच दोन भाग आहेत असें आपणाला म्हणतां येतें.

कामगाराच्या पदरांत पडणारीं वास्तविक मजुरी ( Real wages ) कायम राहील; अगर ती वाढेलहि. परंतु त्याचवेळीं तुलनात्मक मजुरी उतरूं शकेल. आपण असें समजूं, कीं सर्व क्रयवस्तूंच्या किंमती दोन तृतीयांशानें उतरल्या; पण रोजगारांत मात्र फक्त एक तृतीयांशाची काट झाली—म्हणजे ३ अधेल्या ऐवजीं २ च देण्यांत येऊं

लागल्या. यामुळें कामगाराला पूर्वी ३ आधेल्यांना जेवढ्या क्रयवस्तू मिळत त्यापेक्षां अधिक क्रयवस्तु आतां २ अधेल्यांना मिळूं लागल्या खऱ्या; परंतु भांडवलदाराच्या फायद्यांत जी वाढ झाली, तिच्याशीं तुलना करतां कामगारांचा रोजगार उतरला असेंच म्हणावें लागेल. कारण कामगारांच्या रोजगारांत १ अधेलीची काट केल्यामुळें भांडवलदाराच्या फायद्यांत त्या अधेलीची भर पडली. याचाच अर्थ असा कीं, कामगाराला पूर्वीपेक्षां कमी रोजगारावर भांडवलदारासाठीं पूर्वीइतकाच माल पैदा करावा लागूं लागला. म्हणजेच कामगाराच्या वाट्याला येणाऱ्या मिळकतीच्या मानानें भांडवलदाराच्या वाट्याला जाणारी मिळकत वाढली, अगर तुलनात्मक-मजुरी उतरली; भांडवलदाराच्या संपत्तीत भर पडली; कामगाराच्या मिळकतींत काट झाली; व यामुळें समाजांच्या संपत्तीतून भांडवलदारवर्गाला मिळणारा वाटा व कामगारवर्गाला मिळणारा वाटा या दोहोमधील विषमता अधिकच वाढली. पूर्वीइतक्याच भांडवलाच्या जोरावर भांडवलदाराला आतां पूर्वीहून अधिक श्रमशक्ति लुबाडतां येऊं लागली. कामगारवर्गावरील भांडवलदारवर्गाची सत्ता बळावली. कामगाराचा समाजांतील दर्जा अधिक नीच कोटीला गेला—भांडवलदाराच्या मानानें कामगाराचा दर्जा आणखी एक पायरी खालीं दडपला गेला.

यावरून मजूरी व फायदा यांच्या अन्योन्य संबंधाच्या दृष्टीनें, मजूरीची व फायद्याची वाढ झाली कीं काट झाली हें ठरविण्याचा सर्वत्र लागू पडणारा नियम कोणता ?

मजूरी व फायदा यांचें नेहमीं व्यस्त प्रमाण असते. ज्या मानानें कामगारवर्गाच्या वाट्याला येणाऱ्या हिश्शाची, म्हणजेच मजूरीची, काट होते त्याच मानानें भांडवलदारवर्गाचा वाटा म्हणजेच फायदा वाढतो; आणि उलटपक्षीं ज्या मानानें फायद्यांत काट होते त्या मानानें मजूरी वाढते; ज्या प्रमाणांत मजूरींत काट होते त्याचप्रमाणांत फायदा वाढतो; व ज्या प्रमाणांत मजूरींत वाढ केली जाते त्याच प्रमाणांत फायदा उतरतो.

या ठिकाणीं कांहीं लोक असें म्हणतील कीं, इतर भांडवलदारांशीं अधिक किफायतशीर देवघेव करून, किंवा नवीन बाजारपेठा खुल्या झाल्यामुळें म्हणा, अगर जुन्या बाजारांतच त्यांच्या मालाला तात्पुरती अधिक मागणी आल्यामुळें म्हणा, एखाद्या भांडवलदाराचा फायदा वाढूं शकेल; आणि याप्रमाणें कामगारांच्या मजूरीला कोठल्याहि प्रकारें हात न लावतां, केवळ इतर भांडवलदारांवर सरशी केल्यामुळें एखाद्या

भांडवलदाराच्या फायद्यांत वाढ होऊं शकेल. शिवाय, उत्पादन सामुग्रींत अगर यंत्रसामुग्रींत सुधारणा केल्यामुळें किंवा नैसर्गिक शक्तींची वेगळ्या रीतीनें योजना केल्यामुळेंहि भांडवलदाराचा फायदा वाढूं शकेल, वगैरे.

असें जरी झालें, तरी कोणालाहि हें कबूल केलेंच पाहिजे कीं, याप्रमाणें उलट बाजूनें ही गोष्ट घडून आली तरी परिणाम तोच होतो. पगारकाटीमुळें फायद्याची वाढ झाली नसली तरी फायद्यांत वाढ झाली म्हणून तुलनात्मक दृष्ट्या मजुरींत काट होतेच. पूर्वींइतक्याच श्रम-शक्तीच्या जोरावर भांडवलदारानें पूर्वींहून अधिक किंमतीचें विक्रय-मोल खरेदी केलें; परंतु ज्या कामगारांच्या श्रमशक्तीवर भांडवलदाराला याप्रमाणें अधिक मिळकत झाली त्या कामगारांना त्यानें अधिक असें कांहींच दिलें नाहीं! याचाच अर्थ असा कीं कामगारांच्या श्रमशक्तीचें शोषण केल्यामुळें भांडवलदाराला जो वट्ट फायदा झाला त्या मानानें कामगारांना पूर्वींहून कमी कमी मजूरी देण्यांत आली! म्हणजेच मजूरींत काट ही झालीच.

याचबरोबर हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं जरी क्रय-वस्तूंच्या किंमतींत आंदोलनें झालीं तरी दरएक क्रयवस्तूची सरासरी किंमत, दरएक क्रयवस्तूचें इतर क्रयवस्तूंशी पडणारें

देवघेवीचें प्रमाण, त्या क्रयवस्तूच्या उत्पादनखर्चामुळें ठरतें. यामुळें भांडवलदारवर्गात एकमेकांवर सरशी करण्याचे प्रयत्न झाले, तरी अखेर सर्वांचीच किफायत अनिवार्यपणें समान पातळीवर आल्याशिवाय रहात नाहीं. यांत्रिक सुधारणेमुळें व नैसर्गिक शक्तींच्या नवीन धर्तीच्या योजनेमुळें पूर्वीइतक्याच श्रम-शक्तीच्या व भांडवलाच्या जोरावर पूर्वीहून अधिक माल पैदा करणें शक्य होतें; परंतु पूर्वीहून अधिक किंमतीचे विक्रयमोल मात्र पैदा करतां येत नाहींत. आपण एक उदाहरण घेऊं; सूत काढण्याच्या यंत्राचा शोध लागण्यापूर्वीं मी एका तासांत कांहीं ठराविक लड्या सूत काढीत होतों, असें धरून चालूं; त्यानंतर सूत कातण्याच्या यंत्राचा शोध लागल्यामुळें मी त्याच वेळांत दुप्पट सूत काढूं लागलों. मी पूर्वीइतक्याच वेळांत पूर्वीच्या दुप्पट माल पैदा केला. पण यामुळें मला तें सूत विकून एकंदरीत पूर्वीच्या दुप्पट मिळकत कधींहि होणार नाहीं; कारण यंत्रामुळें पैदासखर्च पूर्वीच्या निम्पटीवर आला; मला पूर्वीच्याच किंमतींत दुप्पट माल काढणें शक्य झालें. सारांश, यांत्रिक शोधामुळें वगैरे पूर्वीइतक्याच वेळांत अधिक माल पैदा करतां आला तरी एकंदरींत अधिक विक्रयमोल मात्र पैदा करतां येत नाहींत.

शेवटीं ही गोष्ट तर निर्विवाद आहे कीं, उत्पादनावर

मिळणारा वट्ट फायदा एका देशांतील भांडवलदारवर्गानें काय, किंवा सर्व जगांतील भांडवलदारवर्गानें काय, आपापसांत कसाहि वाटून घेतला तरीहि आपल्या नियमाला बाध येत नाहीं; कारण, पैदाशीवर निष्पन्न होणारा वट्ट फायदा हा कामगारवर्गाकडून भांडवलांत टाकल्या जाणाऱ्या भरीइतकाच नेहमीं असतो, व भरीतूनच केवळ निष्पन्न होऊं शकतो. अर्थातच ज्या प्रमाणांत कामगारांच्या मेहनतीमुळें भांडवलांत भर टाकली जाते, त्याच प्रमाणांत पैदाशीवरील वट्ट फायदा वाढतो. याचाच अर्थ असा कीं कामगारांच्या मजूरीशीं तुलना करतां नफ्याचें प्रमाण ज्या मानानें वाढतें त्याच मानानें भांडवलदारवर्गाचा वट्ट फायदा वाढतो.

याप्रमाणें आपण भांडवल आणि मोलमजुरी यामधील संबंधाचीच केवळ पाहणी केली, तरी आपणाला हें उघड दिसतें कीं, भांडवलदाराचे हितसंबंध आणि मोल–मजूरीचे हितसंबंध परस्परास अत्यंत विरोधी आहेत.

भांडवलाची झपाट्याची वाढ म्हणजेच फायद्याची झपाट्याची वाढ. जर तुलनात्मक-मजूरी झपाट्यानें उतरली तरच फायद्याची झपाट्यानें वाढ होऊं शकते. मजूरीदाखल मिळणारी पैशाची रक्कम वाढली व तीबरोबर वास्तविक मजूरीहि वाढली, तरी देखील तुलनात्मक मजूरी उतरूं शकेल.

ज्या प्रमाणांत भांडवलदाराच्या फायद्याची वाढ होते, त्याच-प्रमाणांत वास्तविक मजूरी वाढली नाहीं, तर तुलनात्मक-मजूरी उतरली, असेंच आपण म्हणणार नाहीं काय? उदाहरणार्थ, तेजीच्या कालांत मजूरींत पांच टक्के वाढ झाली, आणि फायद्यांत तीन टक्के वाढ झाली, तर तुलनात्मक पगार पंचवीस टक्क्यांनीं उतरला असेंच आपण म्हणूं.

अर्थातच, भांडवलाच्या त्वरित वाढीबरोबर कामगाराची मिळकत कांहींशी वाढली, तरी त्याचवेळीं भांडवलदार व कामगार यांमधील सामाजिक विषमतेची दरी रुंदावत जाते; भांडवलाची कामगारावरील सत्ता बळावत जाते व भांडवलदार-वर्गावरील कामगाराचें परावलंबित्वही अधिकाधिक वाढत जातें.

भांडवलाची जलद वाढ होण्यांतच कामगाराचे हित आहे असें सांगण्यांत येते; त्याचा अर्थ फक्त इतकाच कीं, ज्यामानानें कामगार आपल्या मालकाच्या दौलतीत अधिक वेगानें भर घालतो, त्यामानानें त्याच्या तोंडावर मालकाकडून फेकले जाणारे तुकडे कांहींसे अधिक मोलाचे बनतात; त्या-मानानें अधिक कामगारांना काम मिळतें व अधिक कामगार पैदा होऊं लागतात; आणि त्याच मानानें भांडवलदारवर्गावर सर्वस्वी अवलम्बून असणाऱ्या पगारी-गुलामांची संख्याहि वाढत जाते.

याप्रमाणें आपण हें पाहिलें कीं भांडवलशाहीच्या अमदानींत कामगाराना **अत्यंत अनुकुल अशी परिस्थिति**, म्हणजेच **भांडवलाची शक्य तितक्या झपाट्याची वाढ**, ही जरी घेतली, आणि या परिस्थितींत कामगाराच्या आर्थिक जीवनांत कितीहि सुधारणा झाली, तरीदेखील कामगार आणि भांडवलदार यांमधील हितविरोध नष्ट होत नाहीं. **फायदा आणि मजूरी** यांचें प्रमाण पूर्वीइतकें **व्यस्तच** राहते.

ज्यावेळीं भांडवलाची झपाट्यानें वाढ होत असते, त्यावेळीं मजूरींत वाढ होईल; नाहीं असें नाहीं; परंतु त्याहून भांडवलदाराच्या घशांत पडणाऱ्या फायद्याची जलद व बेसुमार वाढ होते; कामगाराच्या आर्थिक दर्जांत सुधारणा होते हें कबूल; पण त्याचबरोबर त्याचा सामाजिक दर्जा खालीं उतरतो—भांडवलदारापासून त्याला अलग करणारी सामाजिक विषमतेची दरड अधिक विस्तृत होत जाते.

अखेर, भांडवलाची सर्वांत झपाट्याची वाढ होत राहणें हीच मोल-मजूरीच्या दृष्टीनें अत्यंत अनुकूल अशी परिस्थिति होय असें सांगण्यांत येतें, त्याचा अर्थ हाच कीं, ज्या मानानें कामगार स्वतःवर हुकमत गाजविणाऱ्या भांडवलदारवर्गाची दौलत झपाट्यानें वाढवितो, ज्या मानानें कामगार आपल्याशीं वैर करणारी भांडवलशाही सत्ता झपाट्यानें वाढवितो, त्या मानानें, त्यांना थोड्याफार सुधारलेल्या स्थितींत भांडवलाच्या सत्तेंत जास्त भर घालण्यासाठीं

राबण्याची मुभा मिळते; आणि ज्या सोनेरी शृंखलांच्या सहाय्यानें भांडवलदार वर्ग त्याला आपल्या पाठीमागून ओढत नेत असतो, त्या सोनेरी शृंखला स्वतःच घडवीत राहण्यांत त्याला समाधान मानावें लागते.

उत्पादक भांडवलाच्या वाढीची व मजूरीच्या वाढीची भांडवलदार अर्थशास्त्रज्ञ म्हणतात त्याप्रमाणें अभेद्यपणें सांगड बसते काय? या बाबतींत आपण भांडवलदारी अर्थशास्त्रज्ञांच्या शद्बांवर विश्वास ठेवता कामा नये. भांडवलाची ज्या मानानें अधिक वाढ होते, त्या मानानें भांडवलदार आपल्या गुलामाला अधिक सुखांत ठेवू शकेल, असें भांडवलदार अर्थशास्त्रज्ञांनीं कितीहि सांगितलें तरी, आपण त्यांच्यावर विश्वास ठेवतांच कामा नये. भांडवलदार कमालीचे चाणाक्ष असतात. भांडवलदारांना अत्यंत काळजीपूर्वकपणें हिशोब ठेवावा लागतो; इतका कीं सरंजामशाही अमीराच्या खुळ्या समजुतींना थारा देणें त्याना अशक्य होतें. सरंजामशाही अमीर उमराव आपल्या खितमतगारांना व हुजऱ्यांना झोकबाज बनविण्यासाठीं उधळपट्टी करीत. भांडवलदारवर्ग कामगारांखातर असे कांहींएक करूं शकत नाहीं. भांडवलदारवर्गाची जीवन–परिस्थितीच अशी असते कीं त्याला काटेतोल हिशोब ठेवणें भागच पडते.

यासाठीं आपण या विषयाची अधिक कसून पाहणी केली पाहिजे. **उत्पादक भांडवलाच्या वाढीचा मजूरीवर काय परिणाम होतो ?**

भांडवलशाही समाजांत उत्पादक भांडवलाची सर्वसाधारण वाढ झाली कीं, **अनेक बाजूंनीं** श्रम-संचय होत जातो. भांडवलदाराची संख्या वाढत जाते व त्यांची श्रीमंतीहि वाढत जाते. भांडवलदारांची संख्या वाढली कीं त्यांची आपसांतील चढाओढहि वाढत जाते. **वाढत्या श्रीमंतीच्या जोरावर प्रचंड यंत्रसामुग्रींनीं सुसज्जित अशा अधिकाधिक बलवत्तर कामगार–फौजांना औद्योगिक चढाओढीच्या समरांगणांत खेचून नेणें भांडवलदारांना शक्य होतें.**

आपला माल दुसऱ्याहून स्वस्त विकूनच एक भांडवलदार दुसऱ्याला हुसकावून लावू शकतो; आणि स्वतःचा नाश करून न घेतां इतरांहून स्वस्त माल विकावयाचा तर, इतरांहून स्वस्तात तो पैदा करणें त्याला भाग पडते; आणि यासाठीं कामगाराचें उत्पादन सामर्थ्य शक्य तेवढें वाढविणें त्याला भाग पडते. पण कामगाराचें उत्पादन-सामर्थ्य मुख्यत्वेंकरून वाढतें, तें **वाढता श्रमविभाग, यंत्रांची** सार्वत्रिकपणें वाढती योजना व त्यांत अखंड सुधारणा, यामुळें वाढतें. ज्यामानानें अधिकाधिक कामगारा-

मध्यें कामाची विभागणी करण्यांत येते; ज्या मानानें प्रचंड व वाढत्या प्रमाणांत यंत्रांची योजना केली जाते; त्या मानानें तुलनात्मकपणें पैदासखर्च कमी कमी होत जातो; आणि त्याच मानानें कामगारांचें श्रम अधिकाधिक फलदायक (Productive) होत जातात. याप्रमाणें, श्रम-विभागणी वाढविण्यासाठीं,यंत्रांचा अधिकाधिक भरणा करण्यासाठीं, व अशा रीतीनें कामगारांची अधिकाधिक मोठ्या प्रमाणावर पिळणूक करण्यासाठीं,भांडवलदारांमध्यें सार्वत्रिक अहमहमिका सुरू होते.

याप्रमाणें वाढत्या श्रम-विभागणीच्या फैलावामुळें, यंत्रांच्या वाढत्या योजनेमुळें व यांत्रिक सुधारणामुळें, अगर नैसर्गिक शक्तीच्या अधिक फायदेशीर व मोठ्या प्रमाणावरील उपयोगामुळें, एखाद्या भांडवलदाराला आपल्या प्रतिस्पर्ध्यांइतकेंच श्रम किंवा संचित–श्रम खर्च करून, प्रतिस्पर्ध्याहून अधिक माल काढतां येऊं लागला, तर असा भांडवलदार पुढें काय करतो ? उदाहरणार्थ, एखाद्या भांडवलदाराला आपल्या प्रतिस्पर्ध्यांना अर्धा वार कापड काढण्यास जो श्रम-काल लागतो तेवढ्याच श्रम-कालांत एक वार कापड काढतां येऊं लागलें, तर असा भांडवलदार पुढें काय करतो ?

तो जर जुन्या बाजारभावानेंच आपले कापड विकत राहिला तर त्याला आपल्या प्रतिस्पर्ध्यांची बाजारांतून हकाल-

पट्टी करतां येणार नाहीं; व स्वतःच्या मालाची विक्रीहि वाढवता येणार नाहीं. ज्या मानानें त्याचें उत्पादन सामर्थ्य वाढत जाते, त्या मानानें विक्रीचे मान वाढविण्याची जरूरीहि वाढत जाते. भांडवलदार ज्या बलवत्तर व भारी किंमतीच्या उत्पादन-साधनांची योजना करतो, त्या साधनांच्या जोरावर अधिक स्वस्तात विक्री करण्याचें सामर्थ्य त्याच्या ठायीं येतें ही गोष्ट खरी; पण या साधनांमुळेंच **अधिक माल विकणें त्याला भाग पडूं लागतें**, व **अधिक विस्तृत** बाजारपेठा शोधून काढणें अनिवार्य होतें. साहजिकपणेंच असा भांडवलदार आपलें कापड आपल्या प्रतिस्पर्ध्यांहून सवंग दरानें विकूं लागतो.

परंतु आपले प्रतिस्पर्धी अर्धा वार कापड ज्या किंमतीला विकतात तेवढ्याच किंमतीला,आपला भांडवलदार एक वार कापड कधींच विकणार नाहीं; प्रतिस्पर्ध्यांना अर्धा वार काढण्यास जो पैदासखर्च पडतो तेवढ्याच खर्चात आपल्या भांडवलदाराला जरी एक वार काढतां येत असला, तरीदेखील तो अर्ध्या वाराच्या किंमतीला एक वार कधींच विकणार नाहीं. कारण असें करून त्याचा कोणत्याहि रीतीनें फायदा होणार नाहीं. फक्त पैदासखर्चाचीच भरपाई होईल. आपल्या भांडवलदाराला अधिक मिळकत झाली तर ती कशामुळें होईल ? त्यानें

आपल्या भांडवलावर अधिक नफा मिळविला म्हणून होईल काय ? नाहीं; त्यानें अधिक भांडवल पैदाशीच्या कामीं लावलें म्हणून त्याला अधिक मिळकत होईल. शिवाय, त्यानें आपल्या प्रतिस्पर्ध्याहून आपल्या मालाची किंमत अगदीं थोड्या टक्क्यांनीं जरी कमी ठेवली तरी त्याचा हेतू साध्य होईल. आपल्या प्रतिस्पर्ध्यांपेक्षां कांहींशा **कमी दरानें माल विकून** तो प्रतिस्पर्ध्यांना व्यापार-क्षेत्रांतून हांकूं शकतो; व त्यांच्या विक्रीचा निदान कांहीं भाग तरी काबीज करूं शकतो; आणि अखेर आपण हें ध्यानांत ठेवलेंच पाहिजे कीं अनुकूल अगर प्रतिकूल हंगामानुसार कोणत्याहि क्रयवस्तूची किंमत **पैदासखर्चाच्या** एक वर तरी असते अगर **खालीं** तरी असते. अर्थातच एक वार कापडाची किंमत ज्या मानानें पूर्वीच्या पैदासखर्चाच्या खालीं अगर वर असेल, त्या मानानें अधिक फलदायक साधनें वापरणारा आपला भांडवलदार आपलें कापड कमी अधिक फायद्यानें विकेल.

परंतु याप्रमाणें प्रतिस्पर्ध्याहून अधिक फायदा मारण्याची आपल्या भांडवलदाराची सवलत फार कालपर्यंत टिकत नाहीं. इतर प्रतिस्पर्धीदेखील तशीच नवीन यंत्रें वापरूं लागतात; तशीच श्रमविभागणी सुरूं करतात; आणि तेवढ्याच अगर त्याहूनहि मोठ्या प्रमाणावर या योजना

करतात. अखेर या नवीन योजना इतक्या सार्वत्रिक बनतात कीं त्या कापडाची किंमत त्याच्या **जुन्या पैदासखर्चाच्या खाली जातें, इतकेंच नव्हे तर नव्या पैदासखर्चाच्याहि खाली जाते.**

अशा रीतीनें, नवीन उत्पादन साधनांची योजना करण्या-पूर्वी जी परिस्थिति असते, त्याच तुलनात्मक परिस्थितीत भांडवलदार फिरून पडतात. आणि नवीन उत्पादन साधना-मुळें त्यांच्या अंगी पूर्वीच्याच किंमतीला पूर्वीहून दुप्पट माल विकण्याचें सामर्थ्य आलें, तरी **आतां** त्यांना पूर्वीहून दुप्पट माल पूर्वीपेक्षां कमी किंमतीला विकणें भाग पडूं लागतें. नवीन साधनामुळें प्रस्थापित झालेल्या नवीन पैदासखर्चानंतर फिरून तेंच रहाट गाडगे चालू राहतें. आणखी वाढती श्रम-विभागणी, आणखी वाढता यंत्राचा प्रसार, आणि या दोहोंचा आणखी वाढता उपयोग; यानंतर चढाओढीमुळें फिरून पूर्वीचाच परिणाम !

याप्रमाणें उत्पादन पद्धतींत आणि उत्पादनाच्या साधनांत सुधारणा अगर क्रांति कशी घडून येते हें आपण पाहिलें. **श्रमविभागणीमुळेंच अधिक श्रमविभागणी घडून येते; यंत्रांच्या योजनेमुळेंच अधिक मोठ्या प्रमाणावर यंत्रांची योजना अमलांत येते; आणि मोठ्या प्रमाणावरच्या**

**कामामुळेंच अधिक मोठ्या प्रमाणावर काम सुरूं होतें.** भांडवलशाही उत्पादनाला जुन्या चाकोरींतून वारंवार बाहेर फेकणारा नियम हाच. आणि कामगाराच्या श्रमाचें उत्पादन-सामर्थ्य आधी वाढविलेलें असते, तें **याच कारणास्तव;** भांडवलाला ते आणखी वाढविणें भाग पडते, ते देखील याच नियमामुळें; भांडवलाला स्वस्त बसूं न देतां, त्याला अखंडपणें "आगे बढाव, आगे बढाव!" असा हुकूम सोडणारा नियम तो हाच; व्यापाराच्या नियतकालीक आंदोलनाच्या मर्यादेंत कोणत्याही क्रयवस्तुची किंमत तिच्या **पैदासखर्चाच्या जोडीला आणणारा** नियम तो हाच.

एखाद्या भांडवलदारानें कितीहि बलवत्तर उत्पादनाची साधनें औद्योगिक आखाड्यांत आणली, तरी चढाओढीमुळें चहूंकडे तशीच उत्पादन साधनें अमलांत येतात; आणि त्या भांडवलदारानें अमलांत आणलेल्या वाढत्या उत्पादन-सामर्थ्याचा अखेर कांहीं परिणाम होत असेल तर तो हाच कीं, **पूर्वीइतक्याच किंमतीला** त्याला आतां १० पट, २० पट अगर १०० पट अधिक माल विकणें भाग पडूं लागतें. किंमतीची भरपाई करण्यासाठीं त्याला आता अधिक माल विकण्याची जरूरी भासूं लागते. आणि ही जरूरी भासते ती अधिक नफा मिळविण्याखातरच नव्हे, तर पैदास खर्चाची

भरपाई करण्याखातर—कारण आपण पहिल्याप्रमाणें उत्पादनाची साधनें वरचेवर अधिकाधिक महाग होत जातात; अर्थातच आपल्या भांडवलदाराला पूर्वींच्याच किंमतीला १०० पटच काय पण १००० पटहि माल विकण्याची तयारी करावी लागेल. आणि त्याच दृष्टीनें नव्हे, तर त्याच्या प्रतिस्पर्ध्यांचाहि दृष्टीनें वाढत्या विक्रीचा प्रश्न जिव्हाळ्याचा होऊन बसतो. वाढती विक्री झाल्याखेरीज त्याला अगर त्याच्या प्रतिस्पर्ध्यांना जगून रहाणेंच अशक्य होतें. यामुळें पूर्वींचाच झगडा फिरून चालू होतो. **आणि ज्यामानानें प्रचलित उत्पादन साधनें अधिक उत्पादक अगर फलदायक होत जातात, त्यामानानें या झगड्याला अधिकच अत्याचारी स्वरूप येत जातें व त्या मानानें श्रम-विभागणीचे तत्त्व व यंत्राची योजना हीं वरचेवर अधिकाधिक मोठ्या प्रमाणांत अमलांत येत जातात.**

एखाद्या भांडवलदारानें अमलांत आणलेलीं उत्पादन-साधनें कितीहि बलवत्तर असलीं, तरी चढाओढीमुळें क्रय-वस्तूंच्या किंमती पैदासखर्चाच्या जोडीला आणल्या जातात. व त्यामुळें अधिक बलवत्तर उत्पादन साधनामुळें मिळणारा वरकड नफा चढाओढ हिरावून घेते. ज्या मानानें पैदासखर्च कमी पडूं लागतो, अगर पूर्वीइतक्याच श्रम-कालांत ज्या

मानानें अधिक माल काढणें शक्य होतें, त्या मानानें अधिकाधिक मालाचें ढिगारे कमी कमी किंमतीला विकणें भांडवलदाराला एका अनिवार्य नियमानुसार भाग पडतें. यावरून ही गोष्ट उघड दिसतें कीं, भांडवलदारानें आपल्या कामगारांचें उत्पादन सामर्थ्य वाढविण्यासाठीं नवीन यंत्रें, नवीन श्रमविभागणी वगैरे खटाटोप केल्यासारखें त्याला दुसरें तिसरें कांहीं लाभत तर नाहींच; पण पूर्वीच्याच श्रम-कालांत अधिक माल काढण्याची अपरिहार्य जबाबदारी मात्र त्याच्या मानगुटीवर बसते. सारांश **त्याला आपलें भांडवल किफायतशीरपणें गुंतविणें अधिक कठीण होत जाते**. क्रयवस्तूंच्या किंमती पैदासखर्चाच्या जोडीला आणण्याचा नियम पाळीत, चढाओढ हात धुवून भांडवलदाराच्या पाठीस लागलेली असते आणि प्रतिस्पर्ध्यांना हाणून पाडण्यासाठीं तो जें जें नवीन हत्यार घडवितो तें तें प्रत्येक त्याच्याहि मानगुटीस बसतें ! यामुळें प्रचलित यंत्रसामुग्री चढाओढीमुळें निकामी ठरण्याची वाट न पहातां, भांडवलदार अत्यंत उतावीळपणें वाढती श्रमविभागणी व नवीन यंत्रसामुग्री यांची एकसारखी योजना करीत राहतो; ( अशा नवीन यंत्रसामुग्रीला अधिक किंमत पडते खरी; पण तिच्या योगानें स्वस्तांत माल पैदा होऊं शकतो. ) हेतू हा कीं चढाओढीपासून जास्तींत जास्त किफायत व्हावी.

ही चढाओढीची धामधूम **सर्व जगाच्या बाजारांत** कशी चालू असते याची आपण कल्पना केली कीं, भांडवलाची वाढ, भांडवलाचा संचय आणि भांडवलाचें केंद्रीकरण, ( concentration ) व यामुळें अखंड श्रमविभागणी, आणि नवीन व सुधारलेल्या यंत्रसामुग्रीची योजना, कशी अमलांत येते; दरएक नवीन पल्ला किती झपाट्यानें, उतावळेपणानें, व अधिकाधिक प्रचंड प्रमाणावर गांठला जातो, हें आपणांस कळेल.

**परंतु, उत्पादक भांडवलाच्या वाढीशीं अभेद्यपणें संलग्न असलेल्या या परिस्थितीचा मजूरांवर काय परिणाम होतो ?**

वाढत्या श्रमविभागणीमुळें एकाच कामगाराला ५, १०, अगर २० कामगारांचें काम करतां येऊं लागतें. अर्थातच वाढत्या श्रमविभागणीमुळें कामगाराकामगारांतील नोकरीची चढाओढ ५ पट, १० पट, अगर २० पट वाढते. कामगारांत चढाओढ होते ती, एक कामगार दुसऱ्यापेक्षां कमी मजूरीवर राबण्यास तयार झाल्यामुळेंच केवळ होते असें नाहीं. एक कामगार ५, १०, अगर २० जणांचें काम करूं लागला, तरीहि कामगारांमधली चढाओढ वाढते. आणि भांडवलाच्या विकासामुळें अमलांत येणाऱ्या व अखंड वाढत

जाणाऱ्या श्रमविभागणीमुळें कामगारांना नोकरी मिळविण्यासाठीं अशा तऱ्हेची एकमेकांशीं स्पर्धा करणें भाग पडतें.

शिवाय, ज्या प्रमाणांत **श्रमविभागणी** वाढते, त्याच प्रमाणांत काम अधिकाधिक साध्या स्वरूपाचें बनत जातें. कामगारांच्या अंगच्या विशेष कुशलतेला किंमत रहात नाहीं. कोणतेंहि काम अगदीं साधें, कंटाळवाणें व हमाली स्वरुपाचें बनतें व त्यासाठीं शारीरिक कुशलता व डोक्याची हुशारीहि लागेनाशी होते. एका कामगाराचें काम इतर सर्व कामगारांना करतां येऊं लागतें. यामुळें त्याचें काम बळकावणारे प्रतिस्पर्धी चहूं बाजूंनीं टपून बसतात. आणि आपण हें ध्यानांत ठेवलेंच पाहिजे कीं, ज्या मानानें एखादें काम अधिक साधें व शिकण्यास सुलभ त्या मानानें त्या कामांत वाकबगार होण्यासाठीं लागणारा खर्च कमी. अर्थातच मजूरींत काट केली जाते; कारण इतर सर्व क्रयवस्तूंच्या किंमतीप्रमाणें मजूरीदेखील कामगाराच्या पैदासखर्चावरूनच ठरते. **अर्थातच ज्या मानानें काम अधिक असमाधानकारक व कंटाळवाणें बनतें, त्या मानानें कामगारांमधील चढाओढ वाढते व मजुरी घटते.** कामगाराला आपली मिळकत कायम राखण्याखातर अधिक श्रम करणें भाग पडूं लागतें; एकतर त्याला जास्त तास राबावें तरी

लागतें, किंवा पूर्वींच्याच वेळांत अधिक माल काढून द्यावा लागतो. याप्रमाणें, उपासमारीच्या कचाट्यांत सांपडल्यामुळें कामगार श्रमविभागणीच्या दुष्परिणामांत भर घालतो. याचा परिणाम असा होतो कीं, **जसजसा तो अधिक काम करतो तसतशी त्याला कमी मजूरी मिळत जाते.** तो याप्रमाणें इतर कामगारभाईविरुद्ध चढाओढ करतो; आणि त्यांना स्वतःइतक्याच दरिद्री रोजगारावर राबावयास भाग पाडतो व स्वतःविरुद्ध चढाओढ करावयास प्रवृत्त करतो. अशा रीतीनें अखेर, **कामगारवर्गाचा एक घटक या दृष्टीनें तो स्वतः आपल्याविरुद्धच चढाओढ करूं लागतो.**

यंत्रांच्या योजनेचा देखील कामगारांवर असाच परिणाम होतो, व तो खूपच मोठ्या प्रमाणावर होतो. यंत्रांमुळें कुशल कामगारांच्या जागा साधेसुधे कामगार घेऊं लागतात. पुरुष कामगारांच्या जागा स्त्री-कामगार घेऊं लागतात; व मोठ्या कामगारांच्या जागा लहान लहान कामगार मुलें घेऊं लागतात. यंत्रांची नवीनच योजना केली जाते त्यावेळीं शेंकडों कामगारांच्या नोकऱ्या जातात. आणि त्यानंतर जसजशी यंत्राची सुधारणा होत जाते, व त्यांचें उत्पादन-सामर्थ्य वाढते तसतसे कामगार थोड्या प्रमाणांत कां होईना पण निकामी होत जातात. येथवर आपण भांडवलदारांची आपसांत

औद्योगिक लढाई कशी चालू असते हें अगदीं थोडक्यांत पाहिलें. **या लढाईचा हा एक विशेष आहे कीं, हिच्या चकमकी कामगार सैन्यांत अधिक रिक्रूटभरती करण्याऐवजीं कामगार सैन्यांतून सैनिकांना बडतर्फ करूनच अधिक जिंकल्या जातात.** आणि सेनापतींची, म्हणजेच भांडवलदारांची आपल्या औद्योगिक फौजांतून जास्तींत जास्त सैनिकांना बडतर्फ करण्यासाठीं अहमहमिका चालू असते.

भांडवलदारी अर्थशास्त्रज्ञ आपणाला सांगतात, कीं यंत्रामुळें बेकार झालेल्या कामगारांना **नवीन** औद्योगिक शाखांत नोकऱ्या मिळतात ! हे अर्थशास्त्रज्ञ स्पष्टपणें असें कधींही ठासून सांगूं शकणार नाहींत कीं, बेकार झालेले कामगारच नवीन धंद्यात कामाला लागतात. कारण वस्तुस्थिति ह्या विधानांचा धादांत खोटेपणा चव्हाट्यावर आणतें. या अर्थशास्त्रज्ञांच्या म्हणण्याचा अर्थ येवढाच कीं, **कामगारवर्गाच्या इतर घटकाना** नवीन औद्योगिक शाखामुळें नोकरीचा वाव मिळेल. उदाहरणार्थ, यंत्रांच्या योजनेमुळें नष्ट झालेल्या औद्योगिक शाखेमध्यें नोकरी करण्याची वाट पहात असलेल्या तरुण पिढीच्या कामगारांना असा वाव मिळेल. नोकरी गमावून बेकार होणाऱ्या कामगारांना ही मोठीच समाधानाची गोष्ट आहे ? भांडवलदार राजेश्रींना पिळणुकीखातर कामगार-

वर्गांतील ताज्यातवान रक्ता-मांसाची कमतरता कधीच भासणार नाहीं. जे बेकारीत पडले त्यांच्याशी आपल्याला काय करावयाचें आहे, या समजीनें भांडवलदार कामगारांचे समाधान करण्याऐवजी **स्वतःचेंच** समाधान करतात! यंत्रामुळें सरसकट सर्व पगारी-कामगारांचा वर्गच नष्ट झाला तर भांडवलदारांवर मोठाच अनर्थ ओढवणार आहे?

पण आपण क्षणभर असें धरून चालूं कीं, यंत्रांमुळें प्रत्यक्ष ज्या कामगारांची नोकरी जाते त्या कामगारांना, आणि त्याच औद्योगिक शाखेंत नोकरी मिळण्याची अपेक्षा करणाऱ्या तरुण पिढीच्या कामगारांना, कोठेतरी नवीन नोकऱ्या मिळतात. पण या नवीन कामाबद्दल त्या कामगारांना पूर्वीइतकीच मजूरी मिळेल असें कोणाला म्हणतां येईल काय? **असें होईल तर तें अर्थशास्त्राच्या सर्वच नियमाच्या उघड उघड विरुद्ध होईल**. आपण हें पाहिलेंच आहे कीं, आधुनिक उद्योगधंद्यात, अधिक कुशलतेची व गुंतागुंतीची कामें दिवसेंदिवस कमी होत जातात व त्यांच्या जागीं साधीसुधीं व कमकसबाचीं कामें अस्तित्त्वांत येतात. असें जर आहे तर, यंत्रामुळें एका औद्योगिक शाखेंतून बाहेर टाकल्या गेलेल्या कामगारांना दुसऱ्या शाखेंत आसरा मिळेल तो तेथें **अधिक हलक्या धर्तीचें व कमी रोजगाराचें** काम असल्याशिवाय मिळेल काय?

याला अपवाद म्हणून यंत्रें बनविणाऱ्या कारखान्यांतच कामावर लागणाऱ्या कामगारांकडे बोट दाखविण्यांत येते. उद्योगधंद्यांत यंत्रांना अधिक मागणी येऊं लागून त्याची वाढती योजना होऊं लागतांच यंत्रांचा आकडा वाढलाच पाहिजे; यामुळें यंत्रांचें उत्पादन वाढलेंच पाहिजे; व यामुळें यंत्रें बनविण्याच्या धंद्यांत अधिकाधिक कामगाराना नोकऱ्या मिळाल्याच पाहिजेत; शिवाय या धंद्यांतील कामगार कुशल असतात इतकेंच नव्हे तर सुशिक्षितहि असतात !

१८४० पूर्वी देखील हें विधान अंशतःच खरें होतें; पण १८४० नंतर या विधानांत खरेपणाचा लवलेशहि राहिलेला नाहीं. कारण, यंत्रें बनविण्यासाठीं दुसऱ्या यंत्रांचा उपयोग करावा लागतो; व हीं यंत्रें बनविण्याची यंत्रेंदेखील सूत काढण्याच्या यंत्राइतकीच निरनिराळ्या धर्तींची व अनेक असतात. आणि यंत्रें बनविण्याच्या कारखान्यांत अत्यंत सुधारलेल्या व कुशल यंत्राच्या लगत कामावर राहिलेले कामगार अगदीं साध्या यंत्राप्रमाणें हालचाली करणारे सांपळेच बनून जातात.

परंतु, यंत्रामुळें बेकारीत टाकल्या गेलेल्या कामगारां-ऐवजी आतां तेवढ्याच मजूरींत एक बायको व तीन मुलें कामावर ठेवण्यांत येतात ! त्या कामगाराच्या मजूरींत या

तीन मुलांचे व एका बायकोचे पोट भरत नव्हतें काय ? त्या कामगाराला मिळणाऱ्या किमान–मजूरीत त्या कामगाराचें कुटुंब जगूनवाचून प्रजोत्पादन करीत नव्हतें काय ? एकंदरींत भांडवलदारांच्या या आवडत्या विधानाचा अर्थ काय ? या भांडवलशाही बडबडीचा अर्थ इतकाच कीं, आतां एका कामगारकुटुंबाच्या पोषणाखातर पूर्वींच्या चौपट कामगारांना आपलें जिणें खर्च करावें लागतें.

**सारांश, ज्या मानानें उत्पादक भांडवलाची वाढ होते त्या मानानें श्रमविभागणी व यंत्राची योजना यांचा विस्तार वाढत जातो; व ज्या मानानें श्रमविभागणीचा व यंत्रांच्या योजनेचा विस्तार वाढतो, त्या मानानें कामगाराकामगारांतील चढाओढ वाढत जाते, आणि त्याच मानानें कामगारांचें पगार काटले जातात.**

आणि याशिवाय, **समाजाच्या वरच्या वर्गांतून** देखील कामगारवर्गांत रिक्रूटांचा भरणा केला जातो. तुटपुंजा मिळकतीवर धंदा करणारे असंख्य छोटे व्यापारी व इतर लोक कामगारवर्गांत येऊन पडतात; आणि कामगारांच्या जोडीनेंच नोकरीसाठीं हात पुढें करण्याखेरीज त्यांना दुसरा तरणोपायच रहात नाहीं. "काम द्या" अशी मागणी करणाऱ्या हाताचें

रान दिवसेंदिवस अधिकाधिक दाट बनत जातें, पण हे हात स्वतः मात्र दिवसेंदिवस एकसारखे रोडावत जातात.

अखंडपणें अधिकाधिक मोठ्या प्रमाणांत पैदास केली तरच ज्या लढ्यांत निभाव लागूं शकतो, त्या लढ्यांत छोटेखानी धंदेवाला टिकाव धरूं शकत नाहीं, ( म्हणजे छोटेखानी धंदेवाला हा एकाच वेळीं छोटा व बडा भांडवलदार असूं शकत नाहीं ) ही गोष्ट उघड आहे. ज्या प्रमाणांत भांडवलाची संख्या व संचय वाढत जातो त्याच प्रमाणांत भांडवलावर येणारें व्याज कमी कमी होत जातें. आणि यामुळें छोट्या भांडवलदाराला आपल्या तुटपुंजा व्याजावर तगून राहणें अशक्य होतें व पोटासाठीं उद्योग धंदा करणें भाग पडूं लागतें. साहजिकच असा छोटा भांडवलदार छोटेखानी कारखानदारांच्या फौजेंत सामील होतो व अशा रितीनें तो कामगारवर्गांत पडणाऱ्या उमेदवारांत दाखल होतो, याबद्दल अधिक खुलासा करण्याची जरूरी नाहीं.

अखेर वर दिलेल्या पद्धतीनुसार आधींच अमलांत आलेल्या प्रचंड उत्पादन-साधनांचा आणखी मोठ्या प्रमाणांवर उपयोग करणें भांडवलदाराना भाग पडतें; आणि यासाठीं त्यांना पतीवरील देवघेवीचे सर्व मार्ग खुले करावे लागतात. आणि ज्या मानानें या सर्व घडामोडीचा विस्तार

वाढत जातो त्याच मानानें औद्योगिक धरणीकंप अधिक वारंवार घडूं लागतात. अशा औद्योगिक धरणीकंपांच्या वेळीं आपल्या संपत्तीचा कांहीं भाग, आपल्या उत्पादनाचा कांहीं भाग, अगर आपल्या उत्पादक–शक्तींचाहि कांहीं भाग या धरणीकंपाच्या होमकुंडांत अर्पण केल्याखेरीज व्यापारी जग स्वतःचें आसन स्थिर राखूं शकत नाहीं. थोडक्यांत, आर्थिक अरिष्टांची संख्या वाढते. तीं अधिक वारंवार येऊं लागतात व अधिक भयानक बनत जातात. याला कारण एकच; तें असें कीं, ज्या मानानें क्रयवस्तूंचा पुरवठा वाढत जातो, व त्यामुळें अधिक विस्तृत बाजारपेठांची जरूरी भासूं लागते, त्याच मानानें जगाची बाजारपेठ अधिकाधिक आटत जाते. दिवसेंदिवस शोषणासाठीं नवीन बाजारपेठा मिळण्याची शक्यता कमी कमी होत जाते; कारण आधींच्या दरएक अरिष्टामुळें त्यावेळपावेतों न लाभलेली अगर उगाच नांवाला वापरली गेलेली नवीन बाजारपेठ व्यापारी जगाच्या तावडींत आलेली असते. पण भांडवल हें कामगारांच्या जिवावर केवळ **जगूनच** थांबत नाहीं; एखाद्या बाजीरावी आणि रानटी सुलतानाप्रमाणें अरिष्टांच्या आगींत होरपळून ठार होणाऱ्या आपल्या असंख्य गुलामांची प्रेतें तें स्मशानाकडे फरपटत घेऊन जाते. **यावरून आपणाला हें दिसून येतें कीं, जर**

भांडवलाची झपाट्यानें वाढ झाली तर कामगाराकामगारांतील चढाओढ जास्तच झपाट्यानें वाढते; व त्याच मानानें कामगारांना नोकरी व जीविताच्या साधनांचा अधिकाधिक झपाट्यानें तुटवडा पडूं लागतो. पण इतकें जरी झालें तरी, भांडवलाची झपाट्यानें वाढ होणें हीच मोल-मजुरांना अत्यंत अनुकूल परिस्थिति होय.

# परिशिष्ट.

पुस्तकांत उल्लेख केलेल्या ऐतिहासिक
प्रसंगांचें स्पष्टीकरण.

# परिशिष्ट.

## पुस्तकांत उल्लेख केलेल्या ऐतिहासिक प्रसंगांचें स्पष्टीकरण.

मार्क्सनें पुस्तकाच्या आरंभींच तत्कालीन ( १८४८ मधील ) यूरोपांतील अनेक राजकीय घडामोडीचा उल्लेख केला आहे. या उल्लेखांचा मुख्य उद्देश, या सर्व घडामोडी तत्कालीन समाजांतील वर्गकलहाचींच व्यक्त स्वरूपें होतीं, ही गोष्ट वाचकांना जातां जातां सांगण्याचा आहे. अर्थात् ही गोष्ट सविस्तरपणें मार्क्सनें आपल्या इतर पुस्तकांत दाखवून दिली असल्यामुळें, येथें या प्रसंगांचा त्यानें फक्त उल्लेखच केला आहे. पण वाचकांना या प्रसंगाचें वर्गस्वरूप कळण्यासाठीं आम्ही खालील थोडासा इतिहास देत आहों.

१७८९-१८४८ पर्यंतच्या यूरोपांतील झगड्यांचा रोख अनियांत्रित राजसत्ता व सरंजामदारांचें राजकीय वर्चस्व यांचें उच्चाटन करून, देशाच्या औद्योगिक प्रगतीला मार्ग खुला करून देण्याकरितां भांडवलदार वर्गाची राजकीय सत्ता स्थापणें हा होता. या भांडवलदार क्रांतीची पहिली सुरवात १७८९ मध्यें फ्रान्समध्यें झाली. १७८८-९३ या कालांत क्रांतीच्या अप्रातिहत ओघांत सरंजामशाहीची पाळेंमुळें उपटून निघालीं. पण १७९२ नंतर प्रतिक्रांतीनें डोकें वर केलें; लोकसत्तेनें मिळविलेले बरेच विजय गाडले गेले व लोकसभा नुसत्या चर्चामंडळें बनल्या. या प्रतिगामी व प्रतिक्रांतिकारक कार्यास मदत करण्यांत इंग्लंड व रशिया हीं प्रमुख होतीं,व ऑस्ट्रीयाचेंही त्यांत अंग होतें.

# परिशिष्ट.

इंग्लंडमध्यें औद्योगिक क्रांति पूर्ण होऊन तेथें मालाची मोठ्या प्रमाणावर पैदास होत असल्यामुळें, जगाच्या बाजारपेठा काबीज करणें, हें तेथील भांडवलदारवर्गाचें ध्येय होतें. याकरितां उदयोन्मुख असलेल्या कोणत्याही परकीय भांडवलदारवर्गाला पाण्यांत पहाणें, हा त्यांचा उपक्रमच होता. रशिया तर बोलून चालून सरंजामशाहीचें अत्युच्च शिखरच होतें;तेव्हां रशिया व इंग्लंड या देशानीं युरोपांतील सरंजामशाहीचे आधारस्तंभ सरंजामदार आणि अनियंत्रित राजसत्ता यांना मदत केली यांत आश्चर्य नाहीं. फ्रान्सच्या बाबतीत जें १७९२ नंतर झाले, तेंच यूरोपांतील इतर राष्ट्रांच्या बाबतींत १८४८ त झालें.

पण एवढ्यानें इतिहासक्रम थांबूं शकत नाहीं, व थांबलाहि नाहीं. औद्योगिक प्रगति व तिला आवश्यक असणारी भांडवलदारसत्ता यांना पोषक असणारी परिस्थिति परिणत होतच होती. यूरोपांतील जहाल भांडवलदार, खालचा मध्यमवर्ग आणि शेतकरी व कामकरी या सर्व वर्गाचें हित सरंजामशाहीचें उच्चाटण करण्यांतच होतें. फेब्रुवारी १८४८ मध्यें पॅरिस कामगारांनीं क्रांतीचा झेंडा उभारला व राजाला राजपदाचा राजीनामा द्यावा लागला, व हंगामी (Provisional) सरकार राज्यारूढ झालें. १३ मार्चला व्हिएन्नाच्या नागरिकांनीं बंड पुकारलें व प्रिन्स मेतरनिचला पळ काढावा लागला. १८ मार्चला बर्लिनच्या रहिवाशांनीं तेंच केलें व राजास शरण यावयास लावलें. अनियन्त्रित सरंजामी राजसत्तेविरुद्ध केलेल्या या उठावांना भांडवलदारांचा पाठिंबा होता. पण लवकरच त्यांचे डोळे उघडले. या उठावांतील कामगारांची स्वतंत्र राजकीय वृत्ति व त्यांचा वाढता क्रांतिकारक जोम भांडवलदारवर्गाला असह्य होऊं लागला. क्रांतिकारक कामगारांवर भिस्त ठेवण्यापेक्षां प्रतिक्रांतिकारक राजसत्ता व सरंजामदारी यांच्याशीं सहकार्य व तडजोड करणें पत्करलें,

असें भांडवलदारवर्गास वाटूं लागलें अर्थात्च भांडवलदारांचें धोरण बदललें व ते कामकऱ्यांच्या विरुद्ध प्रतिक्रांतीच्या गटांत सामील झाले. फ्रान्समधील जूनचा उठाव, व्हिएन्नाचें ऑक्टोबरमधील बंड व बर्लिनमधील नोव्हेंबर महिन्यांतील उठाव या सर्वांना राजसत्तेच्या मदतीनें त्यांनीं रक्ताच्या पुरांत चिरडून टाकलें. फ्रान्समध्यें भांडवलदारी लोकसत्ताक (Bourgeois Democratic)राज्य स्थापन झालें.जर्मनींत राजसत्ताक प्रतिक्रान्तीनें उचल खाल्ली. हंगेरी, इटली व पोलंड यांमधील स्वातंत्र्याची चळवळ दडपून टाकण्यांत आली. या सर्व कार्यास इंग्लंड व रशिया या राष्ट्रांनीं मदत केली.

इटली, पोलंड व हंगेरी या देशांतील स्वातंत्र्याच्या चळवळींचें नेतृत्व भांडवलदारवर्गाकडे होतें. परकीय सरंजामीसत्ता त्यांच्या आड येत होती. औद्योगिक प्रगतीच्या प्रश्नावर या चळवळी उभारल्या असल्यामुळें इंग्लंड व रशिया त्यांच्या विरुद्ध जाणार हें उघड होतें. अशा रीतीनें प्रतिक्रांतीचा विजय होतांच, यूरोप, फिरुन रशिया व इंग्लंड यांच्या दुहेरी दास्यांत पडलें. भांडवलदारांनीं कामगारांच्या भीतीनें आपल्या सरंजामी शत्रूपुढें पड खाल्ल्यामुळें, औद्योगिक प्रगती-करितां मार्ग खुला करणें हें जें क्रांतिकारक उठावाचें कार्य तें अपूर्ण राहिलें. दिवसेंदिवस कामगारवर्ग प्रबल होणार ही भीति वाढत होती. देशादेशां-तील भांडवलदारांचा क्रांतिकारक चळवळींतील आरंभशूरपणाला देखील कामगार वर्गाचें जोरदार दडपण हेंच कारण होतें. अशा रीतीनें भांडवलदार व कामगारवर्ग यांमधील विरोध या १८४८ मधील क्रांति-कारी घडामोडींत प्रामुख्यानें पुढें आला. यामुळें भांडवलदार क्रांतीचें कार्य अर्धवट राहिलें व हें कार्य कामकरी वर्गाच्या हातांत सत्ता जाईपर्यंत तसेंच रहाणार असें मार्क्सनें स्पष्टपणें नमूद केलें आहे. अर्थात्च हा भांडवलदारी वर्ग व कामगार वर्ग यांमधील विरोध कोणत्या आर्थिक

## परिशिष्ट.

...परिस्थितीवर उभारला आहे हें पहाणें जरूर होते व तें **मोल-मजुरी व भांडवल** या पुस्तकांत मार्क्सनें केलें आहे. या दृष्टीनें १८४८ च्या राजकीय क्रांतिकारी चळवळीचें परीक्षण करणारीं मार्क्सचीं पुस्तकें व हें पुस्तक परस्परपूरक आहेत.

मार्क्सकालीन यूरोपीय राजकीय परिस्थितीवर मार्क्सची खालील पुस्तकें फारच वाचनीय आहेत.

The Eighteenth Brumaire of Louis Bonaparte.
Revolution and Counter-Revolution in Germany
The Civil War in France.

---

**मुद्रक व प्रकाशकः—धुं. मा. घारपुरे** यांनीं **मार्क्सिस्ट वाङ्मय मंडळा**तर्फे गिरगांव–मुंबई नं. ४ येथें छापून प्रसिद्ध केलें.

कामत प्रिंटिंग प्रेस, गोवर्धन बिल्डिंग, पारेख स्ट्रीट, मुंबई नं. ४

E
166